नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ४६ * अंक २७ * * चंद्रपूर * रविवार, दिनांक २७ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..



### केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत कारगिल विजय दिवस

■ **द्रास** : कारगिल विजय दिनाला २६ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त लडाखमधील द्रास येथे आयोजित कार्यक्रमात मनसुख मांडवीय आणि संजय सेठ या दोन केंद्रीय मंत्र्यांनी भाग घेतला. १९९९ च्या युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना मंत्र्यांनी श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर पदयात्रा काढण्यात आली. गेल्या वर्षी २५ व्या कारगिल विजय दिनी पंतप्रधान मोदींनी लडाखमध्ये युद्धातील वीरांना श्रद्धांजली वाहिली.

### जयपूरमध्ये सीएम ऑफिस उडवून देण्याची धमकी

■ **जयपूर** : जयपूरमधील मुख्यमंत्री कार्यालय आणि विमानतळ उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. शनिवारी जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अधिकृत ईमेल आयडीवर एक ईमेल पाठवण्यात आला होता ज्यामध्ये एक ते दोन तासांत मुख्यमंत्री कार्यालय आणि विमानतळ उडवून दिले जाईल असे म्हटले होते.

मुख्यमंत्री कार्यालय तसेच विमानतळावर तातडीने तपासणी सुरू करण्यात आली, तथापि, तासाभराच्या तपासानंतर पोलिसांना कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. पोलिस, अग्निशमन दल, बॉम्बशोधक पथक आणि नागरी संरक्षण पथकांनी विमानतळाची तपासणी केली. बॉम्बविरोधी पथक आणि पोलिस पथकही मुख्यमंत्री कार्यालयात पोहोचले होते.



## डीजी लीडर अप्रूव्हल रेटिंगमध्ये मोदी अव्वल!

● द. कोरियाचे राष्ट्राध्यक्ष दुसऱ्या स्थानावर ● टॅरिफ वॉरमुळे ट्रम्प ८ व्या स्थानी ●

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :** शनिवारी जाहीर झालेल्या 'डेमोक्रॅटिक ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग' मध्ये पंतप्रधान मोदी अव्वल स्थानावर आहेत. त्यांना ७५% अप्रूव्हल रेटिंग मिळाले आहे. द. कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग दुसऱ्या स्थानावर आहेत. जय म्युंग यांना ७५% अप्रूव्हल रेटिंग आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे तळाच्या ५ मध्येही स्थान मिळवू शकले नाहीत. हे आकडे अमेरिकेतील बिझनेस इंटेलिजेंस फर्म मॉर्निंग कन्सल्टने जारी केले आहेत.

ट्रम्प ४५% पेक्षा कमी अप्रुव्हल रेटिंगसह आठव्या क्रमांकावर आहेत. हे नवीनतम ग्लोबल लीडर अप्रूव्हल रेटिंग ४ ते १० जुलै २०२५ दरम्यानचे आहे.

मॉर्निंग कन्सल्ट ही अमेरिकेतील एक बिझनेस इंटेलिजन्स आणि डेटा विश्लेषण कंपनी आहे. त्यांच्या सर्वेक्षणात जगभरातील नेत्यांचे, विशेषतः लोकशाही देशांच्या नेत्यांचे सार्वजनिक मान्यता रेटिंग मोजले जाते. हे सर्वेक्षण वेगवेगळ्या देशांमधील हजारो लोकांच्या दैनंदिन मुलाखतींच्या आधारे केले जाते.

सर्वेक्षणात असे आढळून आले की प्रत्येक ४ पैकी ३ लोक मोदींना लोकशाही नेता म्हणून सकारात्मकतेने पाहतात. त्याच वेळी, १८% लोकांचे उलट मत होते आणि सुमारे ७% लोकांचे कोणतेही स्पष्ट मत नव्हते. मे २०२४ मध्ये मोदी तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान म्हणून पुन्हा निवडून आले. गेल्या वर्षी प्रचंड बहुमताने सत्तेत परतलेले अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प आठव्या क्रमांकावर होते. केवळ ४४% सहभागींनी त्यांच्या नेतृत्वाला मान्यता दिली. विश्लेषकांचा असा विश्वास आहे की त्यांच्या काही धोरणांमुळे, शुल्कामुळे आणि देशांतर्गत निर्णयांमुळे त्यांची लोकप्रियता कमी झाली असेल.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये, मॉर्निंग कन्सल्टने २५ देशांच्या प्रमुखांचे मान्यता रेटिंग जाहीर केले होते. पंतप्रधान मोदी ६९% रेटिंगसह या यादीत अव्वल स्थानावर होते. तथापि, त्यांचे रेटिंग सुमारे ६% ने वाढले आहे. त्या वेळी मेक्सिकन राष्ट्राध्यक्ष आंद्रेस मॅन्युएल लोपेझ ओब्राडोर यांना यादीत दुसरे स्थान मिळाले. त्यांचे अनुमोदन रेटिंग ६०% होते. त्यावेळी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांचा टॉप-१० नेत्यांमध्येही समावेश नव्हता. ते १२ व्या क्रमांकावर होते.

## एक्सप्रेस वेवर अपघात

### अनेक वाहने धडकली, ३५ प्रवासी जखमी




■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शनिवारी दुपारी खोपोली परिसरातील बोरघाटात एक अत्यंत भीषण अपघात झाला. ब्रेक फेल झालेल्या एका कंटेनरने २५ ते ३० हून अधिक वाहनांना जोरदार धडक दिली, ज्यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली.

या अपघातात सुमारे ३५ प्रवासी जखमी झाले असून, एका महिला प्रवाशाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. मात्र, अद्याप पोलिसांकडून याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

माहितीनुसार, सदर अपघात खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत, नवीन बोगदा ते फूडमॉल हॉटेल दरम्यान, मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर दुपारी घडला. ब्रेक फेल झालेल्या कंटेनरचा ताबा सुटल्याने, त्याने समोर असलेल्या एकामागोमाग एक अशा अनेक चारचाकी, खासगी आणि मालवाहू वाहनांना जोरदार धडक दिली.

अपघातातील वाहनांचे प्रचंड नुकसान झाले असून, काही गाड्या अक्षरशः चक्काचूर झाल्या आहेत. काही वाहनांमध्ये अडकलेल्या प्रवाशांची सुटका करण्यात बचाव पथकांना यश आले आहे. कंटेनरचे ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

**जखमींवर रुग्णालयात उपचार**

अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलिस, महामार्ग सुरक्षा पथक आणि स्थानिक प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. ३५ प्रवासी किरकोळ ते गंभीर स्वरूपाच्या दुखापतींनी जखमी झाले असून, त्यांना खोपोलीतील नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी २० ते २२ जणांना पुढील उपचारासाठी इतर रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले आहे. परिसरातील ग्रामपंचायतींकडून अतिरिक्त रुग्णवाहिका मागवण्यात आल्या आहेत.

अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे. वाहतूक पोलिस आणि महामार्ग प्राधिकरणाकडून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## ३३७ कोटींच्या मदतीला सरकारची मंजुरी

**३ लाख ९८ हजार शेतकऱ्यांना दिलासा**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :** फेब्रुवारी ते मे २०२५ या कालावधीत अवकाळी पावसाने आणि गारपिटीने राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठे नुकसान केले. या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या ३ लाख ९८ हजार ६०३ शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ३३७ कोटी ४१ लाख ५३ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीला मंजुरी दिली आहे. या निर्णयाबद्दल अधिकृत शासन निर्णय जारी करण्यात आला असून, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी ही माहिती दिली.

जाधव-पाटील म्हणाले की, अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून हा निधी त्वरीत मंजूर करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात ६७,४६२ शेतकऱ्यांना ५९.९८ कोटी, पुणे विभागात १,०७,४६३ शेतकऱ्यांना ८१.२७ कोटी, नाशिक विभागात १,०५,१४७ शेतकऱ्यांना ८५.६७ कोटी, कोकण विभागात १३,६०८ शेतकऱ्यांना ९.३८ कोटी, अमरावती विभागात ५४,७२९ शेतकऱ्यांना ६६.१९ कोटी आणि नागपूर विभागात ५०,१९४ शेतकऱ्यांना ३४.९१ कोटी रूपयाची मदत मिळणार आहे पंचनामे करून ही मदत वितरित केली जाणार असल्याचेही मंत्र्यांनी सांगितले.

## आशिया कप क्रिकेट युएईमध्ये

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :** आशिया कप २०२५ हा युएईमध्ये खेळला जाणार आहे. ही स्पर्धा ९ सप्टेंबर रोजी सुरू होईल आणि अंतिम सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल. आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी ही माहिती दिली आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष असलेले नक्वी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिले आहे की, मला हे कळवताना आनंद होत आहे की एसीसी आशिया कप २०२५ आता अधिकृतपणे ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान यूएईमध्ये खेळला जाईल.

भारताला २०२५ च्या आशिया कपचे यजमानपद मिळाले आहे, परंतु भारत आणि पाकिस्तानमधील वाईट संबंधांमुळे तो तटस्थ ठिकाणी खेळवला जाईल. ही स्पर्धा टी-२० स्वरूपात असेल.




## अरे बाबा.. आपले वाटोळे झाले!



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६ :** हिंजवडी परिसरात विविध विकास कामाची पाहणी करत असताना अजित पवार यांना भेटण्यासाठी आलेले, हिंजवडीचे सरपंच गणेश जांभूळकर यांना खडेबोल सुनावले.

या परिसरात विकास कामात मुळे बाधित होणाऱ्या मंदिरा संदर्भातला प्रश्न जांभूळकर यांनी उपस्थित केला. यावर अजित पवार यांनी सर्वांसमोर सरपंचाला खडे बोल सुनावले. धरण करताना मंदिरे जात नाहीत का? तुम्हाला जे सांगायचे तुम्ही सांगा, मी ऐकून घेतो. मात्र, मला जे करायचे ते मी करेलच. अहो आपले वाटोळे होत आहे. हिंजवडीचे सर्व आयटी पार्क बाहेर चालले आहेत. पुण्यातून, महाराष्ट्रातून ते बाहेर जात आहेत. बेंगलोरला, हैदराबादला जात आहेत. तुम्हाला इकडे काय पडले? असा प्रति प्रश्न अजित पवार यांनी उपस्थित केला.

मी सकाळी सहा वाजता पाहणी करायला कशासाठी आलो. मला कळते, ती माझी देखील माणसे आहेत. मात्र हे काम केल्याशिवाय गत्यंतर नसल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

शनिवारी पहाटेपासून, राजीव गांधी आयटी पार्क, हिंजवडी येथील विविध स्थानिक समस्या, पुणे मेट्रो लाईन ३ प्रकल्पाची पाहणी आणि वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सुरू असलेल्या उपाययोजनांची पाहणी अजित पवार यांनी केली.




## पूर्व विदर्भात रेड अलर्ट



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यासाठी नागपूर वेध शाळेने रेड अलर्ट जाहीर केला आहे. तर नागपूर आणि वर्धा या दोन जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

राज्यासह विदर्भात दमदार पावसाच्या सरी कोसळत आहे. अशातच मधल्या काळात विश्रांती घेतलेल्या धुव्वाधार पावसाने पुन्हा एकदा आगमन केले असून येथील विविध जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात शुक्रवारी मुसळधार पाऊस कोसळला. या जिल्ह्यातील नदीनाल्यांना पूर आला असून, संभाव्य इशारा लक्षात घेता नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचना प्रशासना मार्फत देण्यात आल्या आहेत.



# १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार

## सुळे, बारणे, सावंत, म्हस्के, स्मिता वाघ, वर्षा गायकवाड आणि मेधा कुलकर्णी यांचा समावेश



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्यांना उत्कृष्ट संसदीय कामकाजासाठी दिला जाणारा संसद रत्न पुरस्कार जाहीर झाले आहेत. प्राइम फाउंडेशनच्या वतीने हे पुरस्कार दिले जातात. यामध्ये देशातील सतरा खासदार आणि दोन संसदीय स्थायी समिती यांना हा पुरस्कार दिला गेला आहे. विशेष म्हणजे यामध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांनी आपल्या कायार्ची चूकुन दाखवत हे पुरस्कार पटकावले आहे.

या सात खासदारांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, शिवसेनेचे श्रीरंग अप्पा बारणे, भाजपच्या स्मिता वाघ, अरविंद सावंत, नरेश म्हस्के, वर्षा गायकवाड, आणि भाजपच्या मेधा कुलकर्णी यांचा समावेश आहे.

संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या 17 खासदार आणि 2 संसदीय स्थायी समित्यांना 2025 च्या संसदरत्न पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे. हे पुरस्कार संसदेतील सक्रियता, वादविवादात सहभाग, प्रश्न विचारणे आणि कायदेविषयक कामात योगदान या आधारावर दिले जातात. हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशनने सुरू केला आहे. या वर्षीच्या विजेत्यांची निवड राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखालील ज्युरी समितीने केली. ते म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी संसदेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात.

संसदीय लोकशाहीत उल्लेखनीय आणि शाश्वत योगदान दिल्याबद्दल चार खासदारांना विशेष सन्मानित केले जाईल. प्राइम पॉइंट फाउंडेशनच्या मते, हे चार खासदार 16 व्या आणि 17 व्या लोकसभेत संसदेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांमध्ये देखील आहेत आणि त्यांच्या चालू कार्यकाळात सतत सक्रिय आहेत. उर्वरित 13 खासदारांचीही त्यांच्या उत्कृष्ट संसदीय कायार्साठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधी समाविष्ट आहेत. या खासदारांनी संसदेत प्रश्न विचारण्यात, चर्चेत भाग घेण्यात आणि विधेयकांवर सूचना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

दोन संसदीय समित्यांनाही सन्मान मिळाला. या वर्षी दोन संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले जाईल. यामध्ये वित्तविषयक स्थायी समिती - अध्यक्ष : भर्तृहरी महताब या समितीने संसदेत आर्थिक धोरणांवरील अनेक प्रभावी आणि व्यावहारिक अहवाल सादर केले आहेत. कृषीविषयक स्थायी समिती - अध्यक्षः चरणजीत सिंह चन्नी (काँग्रेस) या समितीने संसदेत शेतकऱ्यांच्या समस्या आणि कृषी सुधारणांवर ठोस सूचना मांडल्या आहेत.

### संसदरत्न पुरस्कार विजेते इतर खासदार

स्मिता वाघ (भाजप)
अरविंद सावंत (शिवसेना उद्धव ठाकरे गट)
नरेश गणपत म्हस्के (शिवसेना)
वर्षा गायकवाड (काँग्रेस)
मेधा कुलकर्णी (भाजप)
प्रवीण पटेल (भाजप)
रवी किशन (भाजप)
निशिकांत दुबे (भाजप)
विद्युत बरन महतो (भाजप)
पी. पी. चौधरी (भाजप)
मदन राठोड (भाजप)
सी. एन. अन्नादुराई (द्रमुक)
दिलीप सैकिया (भाजप)

**संसदरत्न पुरस्कार म्हणजे काय?**

संसदरत्न पुरस्कार 2010 मध्ये सुरू करण्यात आला आणि पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये मजबूत करण्यासाठी संसदेत सक्रिय राहणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात. खासदारांना प्रोत्साहन देणे आणि लोकांमध्ये संसदीय कामकाज लोकप्रिय करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

# 'शॉर्टकट' जीवघेणा ठरला कार थेट खाडीत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

गुगल मॅपवर दाखवलेल्या मार्गावर विश्वास ठेवणं एका महिलेच्या जीवावर बेतण्याची वेळ आली होती. शुक्रवारी (25 जुलै) पहाटे 1 वाजण्याच्या सुमारास बेलापूर परिसरात ही धक्कादायक घटना घडली. उलवेच्या दिशेने जात असलेल्या महिला चालकाने गुगल मॅपवर दाखवलेला सरळ रस्ता स्वीकारला, मात्र त्या रस्त्याचा शेवट थेट ध्रुवतारा जेट्टीकडे जात असल्याने तिची कार थेट खाडीत कोसळली. सुदैवाने, सागरी सुरक्षा पोलिसांनी वेळीच मदत करत तिचा जीव वाचवला.

अपघातग्रस्त महिला कारने उलवेच्या दिशेने जात होती. बेलापूर खाडी पुलाचा मार्ग टाळून गुगल मॅपवर दाखवलेल्या पर्यायी रस्त्याने ती निघाली. मात्र, हा मार्ग जेट्टीवर जाऊन संपतो, हे लक्षात येईपर्यंत उशीर झाला आणि कार थेट खाडीत कोसळली. घटनास्थळाजवळील गस्त घालणाऱ्या सागरी सुरक्षा पोलिसांनी ही बाब वेळीच लक्षात घेतली. त्यांनी तातडीने बोटीच्या सहाय्याने घटनास्थळी धाव घेतली आणि पाण्यात अडकलेल्या महिलेची सुखरूप सुटका केली. क्रेन च्या मदतीने कारलाही बाहेर काढण्यात आलं. अपघातस्थळ सागरी पोलिस चौकीजवळ असल्यामुळे मदत लवकर पोहोचली आणि मोठा धोका टळला. बचावलेल्या महिलेने पोलिसांना सांगितलं की, गुगल मॅपवर दाखवलेला रस्ता तिला सरळ वाटला. प्रत्यक्षात, तो रस्ता जेट्टीवर जाऊन थांबतो आणि तिथे कोणताही अडथळा किंवा सूचना फलक नव्हता. रात्रीचा काळ असल्याने रस्ता स्पष्ट दिसला नाही आणि अनपेक्षितपणे कार पाण्यात गेली.

# शिंदेंचा दिल्ली दौरा ठरवणार 'तिघांची' मंत्रिपदसंपत्ती?

## राठोड, कदम यांच्या राजकीय भवितव्यावर निर्णयाची शक्यता!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

महाराष्ट्रातील महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळ फेरबदलाची जोरदार चर्चा सुरु असताना, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दिल्ली दौरा सध्या राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरतो आहे. फडणवीसांनी नुकतीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत भेट घेतल्यानंतर, आता शिंदेही दिल्लीत शाह यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे. या भेटीत त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील वादग्रस्त मंत्र्यांची गच्छंती होणार की त्यांचं राजकीय पुनर्वसन होणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, भाजप नेत्यांकडून आणि विरोधकांकडून सातत्याने लक्ष केले जात असलेल्या शिवसेनेच्या संजय शिरसाट, संजय राठोड, आणि योगेश कदम या तिघांच्या मंत्रिपदावर गंडांतर असल्याची चर्चा आहे. शिरसाट यांच्यावर आलेल्या एकापाठोपाठ एक आरोपांनी पक्षासाठी अडचणी निर्माण केल्या आहेत. त्यांच्या मुलावर फसवणुकीचे आरोप झाले, त्यानंतर हॉटेल खरेदी आणि जमीन घोटाळ्याच्या आरोपांनी वातावरण तापवले. या प्रकरणांत चौकशीचे आदेशही फडणवीसांनी दिले आहेत. या गोंधळात खासदार संजय राऊत यांनी शिरसाटांचा व्हिडिओ ट्विट करून, बॅगमधून नोटांच्या बंडलांचा आरोप केला आणि वाद आणखी चिघळला. दरम्यान, संजय राठोड यांच्यावर खुद्द भाजप आमदार संदीप जोशी यांनी पैसे घेऊन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी फडणवीसांना पत्रही दिले आहे.

याशिवाय, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याबाबत विधानपरिषदेत अनिल परब यांनी डान्सबार प्रकरण उघड करत मोठा गौप्यस्फोट केला. कदम यांच्या आईच्या नावावर मुंबईत डान्सबार असल्याचा परब यांचा आरोप होता.

या तिन्ही मंत्र्यांमुळे शिंदे गट अडचणीत सापडला असून, अधिवेशन काळात शिंदे गटाला बॅकफूटवर जावं लागलं आहे. त्यामुळे शिंदेंचा दिल्ली दौरा हे या वादग्रस्त मंत्र्यांचं भवितव्य ठरवणारं ठरणार असल्याचं सूत्रांचं म्हणणं आहे.

अमित शाह यांच्यासोबतच्या या भेटीत शिंदे यांच्याकडून आपल्या गटातील मंत्र्यांची मंत्रिपद वाचवण्यासाठी जोरदार शर्थ होण्याची शक्यता आहे. मात्र केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्यावर जर नाराजी व्यक्त केली तर, महायुती सरकारमध्ये लवकरच मोठा राजकीय भूकंप होण्याची चिन्हं दिसत आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने डॉ.नीलम गोऱ्हे सन्मानित



■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २६ :

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना समाजासाठी आणि राज्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. होळकर संस्थान, इंदोरचे राजे भूषण सिंह होळकर महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी राजे भूषण सिंह होळकर महाराज म्हणाले की डॉ. गोऱ्हे यांनी समाजातील वंचित घटकांसाठी आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य स्तुत्य आहे. त्यांनी पुढे सांगितले की महाराष्ट्राची परंपरा आहे की राजकीय मतभेद असले तरी चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी सर्वजण उभे राहतात.

त्यांनी डॉ. गोऱ्हे यांच्याबद्दल म्हटले की त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श जपत महिलांना न्याय व शिक्षणाची दिशा दिली आहे. त्यांनी डॉ. गोऱ्हे यांना महाराजा यशवंतराव होळकर यांच्यावर आधारित 'महाराजा-ए-हिंद' हे इतिहासाचे पुस्तक भेट दिले. पुरस्कार स्वीकारताना डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, "हा पुरस्कार माझ्यासाठी नाही, तर समाजातील त्या सर्व महिलांसाठी आहे ज्या आपल्या हक्कांसाठी, शिक्षणासाठी आणि सन्मानासाठी लढत आहेत." त्यांनी जेजुरी परिसरातील मुरळी प्रथेच्या निर्मूलनासाठी केलेल्या कायार्चा उल्लेख करत सांगितले की या प्रयत्नांमुळे जवळपास २०० महिला व मुलींना या प्रथेतून मुक्त करण्यात आले. डॉ. गोऱ्हे यांनी पुढे सांगितले की महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजपरिवर्तनासाठी सातत्याने प्रयत्न करणे हेच अहिल्यादेवी होळकर यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांनी आमदार निधीतून जेजुरी व इतर तीर्थक्षेत्रांच्या विकासासही हातभार लावला आहे. त्या म्हणाल्या की स्त्री सक्षमीकरण आणि समाजकल्याणाचे काम हीच त्यांची खरी ध्येयपूर्ती आहे.

# महायुती सरकार चारित्र्यहिन ७५ टक्के मंत्री बिनकामाचे

## संजय राऊत यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

सत्तेतील महायुती सरकार चारित्र्यहिन असून ७५ टक्के मंत्री बिनकामाचे आहेत, असा आरोप शिवसेना (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी शनिवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमत्त त्यांच्या गुणांचा गौरव करणाऱ्या स्मरणिका निघाल्या.

शरद पवारांपासून उद्धव ठाकरे पर्यंत अनेकांनी स्तुतीसुमने उधळली. त्यातील फुले अजून सुकली नसतील तर देवेंद्र फडणवीसांनी आपण चारित्र्यवान आहोत, चारित्र्यवान सरकार चालवतो हे सिद्ध करावे, असे आव्हान केले. तसेच सरकारच्या मंत्रिमंडळातील ७५ टक्के मंत्री बिनकामाचे आहेत. काहीजण दरोडेखोर म्हणून काम करत आहेत. मंत्रिपदाचे भान त्यांना राहिलेले नाही.

अशांवर कारवाई करण्यासाठी गृहमंत्री फडणवीस कोणाला घाबरत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे काही गुपीते आहेत का, असा सवाल त्यांनी विचारला. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह अनेक मंत्र्यांना पायउतार व्हावे लागेल, असा दावा करत राजीनाम्याच्या वृत्ताचा पुर्नच्चार केला.

# अजितदादांच्या वक्तव्यावरून काँग्रेस आक्रमक

## पुणे शहराची वाट लावणाऱ्या अजित पवारांनी राजीनामा द्यावा : हर्षवर्धन सपकाळ



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २६ :

काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात हिंजवडीत वाढीस लागलेला आयटी उद्योग आता मात्र बंगळूरु व हैदराबादकडे जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच ते कबुल केले, पण पुण्याची अधोगती होईयंत पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार व राज्य सरकार काय झोपा काढत होते काय? असा संतप्त प्रश्न विचारून अजित पवारांनी याची जबाबदारी घेऊन राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

भाजपा युती सरकार व पुण्याचे पालक मंत्री अजित पवार यांचा समाचार घेत हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, पुणे हे महाराष्ट्रातील औद्योगिक, सांस्कृतीक व राजकीय घडामोडींचे महत्वाचे केंद्र आहे. पुण्याचा नावलौकिक सर्वच बाबतीत मोठा होता पण तो आता इतिहासजमा झाला असून पुण्यात आता कोयता गँग, ड्रग्जचा काळाबाजार जोरात सुरु आहे. एक पाऊस पडला तरी पुणे जलमय होते वरून ट्रॅफिकची समस्या वाढलेली आहे, परिणामी आयटी उद्योगाला घरघर लागली आहे. पुण्यासह राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, सत्ताधारी पक्षाचा वाढलेला भ्रष्टाचार, पदाधिकाऱ्यांची गुंडगिरी यांना उद्योजक वैतागले असून पायाभूत सुविधांचा बट्ट्याबोळ झाला आहे म्हणून आय टी उद्योग दुसऱ्या राज्यात जात आहेत.

राज्यातील आहे ते उद्योग तर जातच आहेत पण राज्यात येऊ घातलेली मोठी गुंतवणूकही कशी गुजरातली गेली हे काँग्रेस पक्षाने सातत्याने उघड केले आहे. वेदांता फॉक्सकॉन हा तब्बल १.६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व २ लाख रोजगार देणारा उद्योग भाजपा युती सरकारच्या नाकर्तेपणामुळेच गुजरातला गेला पण भाजपा सरकार मात्र ते मान्य करायला तयार नाही. आता जर उपमुख्यमंत्रीच उद्योग बाहेर जात आहेत हे सांगत असतील तर सरकारने यावर खुलासा करावा, असे सपकाळ म्हणाले.

फक्त पुणे शहराचीच वाताहत होत नसून नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि मुंबईतही फारशी समाधानकारक परिस्थिती नाही. राज्यात बेरोजगारांच्या फौजा उभ्या आहेत, त्यांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करत आहे, महागाईने जगणे कठीण झाले आहे आणि सरकारचे मंत्री मात्र हिंदू मुस्लीम भांडणे लावून खोके भरत आहेत. ही आका व खोके संस्कृतीच महाराष्ट्राचा घात करत असून एवढे भ्रष्ट, निष्क्रीय व निर्ल्लज सरकार राज्यात आजपर्यंत झालेले नाही, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# सटाण्याजवळ गुजरातची बस उलटल्याने दोन महिला जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
मालेगाव, दि. २६ :

एका वाहनाच्या पुढे जाण्याच्या प्रयत्नात समोरुन आलेल्या मोटारीला वाचविताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने गुजरात परिवहन महामंडळाची बस उलटली. शुक्रवारी सटाणा - मालेगाव रस्त्यावर हा अपघात झाला. या अपघातात दोन महिला प्रवासी किरकोळ जखमी झाल्या.

गुजरात परिवहन महामंडळाच्या पाटण- मालेगाव या बसला हा अपघात झाला. बस सटाण्याहून मालेगावकडे निघाल्यावर चिंचावड फाट्याजवळ एका मालमोटारीच्या पुढे जात असताना समोरुन भरधाव मोटार येत असल्याचे बस चालकाच्या लक्षात आले.

त्याने अपघात टाळण्यासाठी प्रसंगावधान राखत बस रस्त्याच्या उजव्या बाजूला घेण्याचा प्रयत्न केला. त्यात चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला उलटली. बसमध्ये चालक, वाहक आणि अन्य सात प्रवासी होते. त्यात हदिमाबिबी अब्बास मिया (६०) आणि अन्सारी मियाजबानो मोहंमद रफिक (३९, दोन्ही रा.अहमदाबाद) या महिला किरकोळ जखमी झाल्या. त्यांना मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंतर स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ मदत कार्यासाठी धावून आले. अपघाताची माहिती मिळाल्यावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सटाणा आगाराचे वाहतूक निरीक्षक आकाश बस्ते यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

अपघातात बसचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातस्थळी रस्त्याच्या कडेला मोठी झाडे आहेत. मालेगाव-सटाणा या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढली आहे. परंतु, तुलनेत रस्ता अरुंद आहे. रस्त्यावर जागोजागी खड्डे आहेत. चालकांना खड्डे टाळण्यासाठी अनेकदा कसरत करावी लागते. त्यामुळे या रस्त्यावर वारंवार अपघात घडत असतात.

वाढती रहदारी व अरुंद रस्ता यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत असल्याने या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, ही मागणी सातत्याने केली जात आहे. दरम्यान अपघात प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात बस चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मराठीत बोलण्यास सांगितल्याने विद्यार्थ्याला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :

नवी मुंबईत एका विद्यार्थ्याने मराठीत बोलण्यास सांगितले तेव्हा त्याच्या वर्गमित्रांनी त्याला मारहाण केली. पोलिसांनी सांगितले की, ते सर्वजण एका कॉलेजच्या व्हॉट्सप ग्रुपचा भाग होते. त्यातील काही जण 21 जुलै रोजी हिंदीत संदेश लिहित होते. त्यानंतर एका विद्याथ्यानें मराठीत लिहा 'मराठीत बोला नाहीतर राज ठाकरे येतील.'

यानंतर व्हॉट्सअप ग्रुपमध्ये वाद सुरू झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेदहा वाजता वाशी येथील कॉलेजबाहेर मराठीत बोलण्यास सांगणाऱ्या विद्यार्थ्यावर फैजान नाईकसह चार विद्यार्थ्यांनी हल्ला केला. नाईकने हॉकी स्टिकने विद्यार्थ्याच्या डोक्यातही वार केले. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. या घटनेनंतर मनसेने हल्ला करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मनसेचे प्रवक्ते गजानन काळे म्हणाले की, आम्ही पीडित विद्याथ्यार्ला आणि त्याच्या कुटुंबाला भेटलो आहोत. दोषींना शिक्षा होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. ही घटना महाराष्ट्रातील वाढती भाषिक दरी धोकादायक असल्याचा इशारा आहे.

# अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत वारसाला नोकरी देण्यासाठी कार्यपद्धती तयार करा : धर्मपाल मेश्राम



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २६ :

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत, अत्याचार प्रकरणांमध्ये मृत व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय सेवेत वर्ग ३ वा वर्ग ४ च्या पदावर प्राधान्याने नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती सामाजिक न्याय विभागाने तयार करावी, असे निर्देश अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्याच्या वारसाला नोकरी देण्याबाबत मुंबई येथील अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या वरळी येथील कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे उपसचिव रवींद्र गोरवे, अवर सचिव सतीश खैरमोडे, सामान्य प्रशासन विभागाच्या अवर सचिव संगीता शिंदे, किशोर बडगुजर, गणेश भदाने, संजय कोठे, बाळासाहेब सोळंकी, शिवानंद भिनगीरे, मुंबई विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी, पुणे विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, आयोगाच्या वरिष्ठ संशोधन अधिकारी मिनाक्षी आडे, वरिष्ठ लिपीक शेख अय्युब, श्री सकपाळ, वित्त, सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण आयुक्तालय विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपाध्यक्ष श्री. मेश्राम म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये अशी ८१४ प्रकरणे प्रलंबित आहेत.

यातील ५ जिल्ह्यांतील ३९ वारसांना नोकरी देण्यात आली आहे. मात्र उर्वरित जिल्ह्यात हा निर्णय लागू न झाल्याने इतर प्रलंबित परिवार प्रतिडीत आहेत. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कमावत्या मृत व्यक्तीच्या कुटुंबातील पात्र वारसाला नोकरी देण्याच्या प्रक्रियेसाठी प्रादेशिक उपआयुक्त कार्यालयाने जिल्हानिहाय वर्ग ३ आणि वर्ग ४ मधील रिक्त पदांची यादी सर्व प्रादेशिक उपायुक्तांनी संकलित करून ती समाज कल्याण आयुक्तालयाकडे १५ दिवसात सादर करावी.

# राज ठाकरे यांची महापालिकेसाठी मोर्चेबांधणी ८ नव्या शिलेदारांची निवड



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई महापालिकेसाठी जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरूवात केली आहे. या प्रकरणी शनिवारी त्यांनी आपल्या पक्षाच्या 8 नव्या पदाधिकाऱ्यांची निवड केली. या नव्या दमाच्या पदाधिकाऱ्याच्या जोरावर राज मुंबई महापालिकेतील आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करणार आहेत. दरम्यान, मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी मराठीच्या मुद्यावर मनसेवर केलेली टीका धुडकावून लावली आहे. 'मला फक्त चितळ्यांची भाकरवडी माहिती आहे', असे ते म्हणालेत.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची लवकरच निवडणूक होण्याची शक्यता आहे. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी शनिवारी मुंबईतील 8 नव्या विभागप्रमुखांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. यात गुजराती व उत्तर भारतीयांचे प्राबल्य असणाऱ्या कांदिवली पूर्व विधानसभा विभाग अध्यक्ष म्हणून महेश फारकसे, जोगेश्वरी विधानसभा विभाग अध्यक्षपदी दीपक आर्य, दहिसर विधानसभा विभाग अध्यक्षपदी पांडुरंग राणे, बोरिवली विधानसभा अध्यक्षपदी विश्वास मोरे याची नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय कुर्ला विधानसभा विभाग अध्यक्षपदी प्रदीप वाघमारे, अणुशक्ती नगर विधानसभा अध्यक्षपदी रवींद्र शेलार, भांडुप विधानसभा विभाग अध्यक्षपदी अनिल पंडित राजभोज व मलबार हिल विधानसभा विधाग अध्यक्षपदी दिनेश पुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी पक्षाच्या केंद्रीय समितीला अकार्यक्षम पदाधिकाऱ्यांच्या जागी नव्या कार्यकर्त्यार्ची निवड करण्याची सूचना केली होती.

**मनसेचा उद्याचा मेळावा रद्द**

दुसरीकडे, मनसेने उद्याचा रंगशारदा सभागृहात होणारा आपला मेळावा अचानक रद्दबातल केला आहे. पक्ष संघटनेतील बदल प्रक्रियेमुळे हा मेळावा लांबणीवर टाकण्यात आल्याची माहिती आहे. या मेळाव्याची नवी तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

# तुर्भेत भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी
नवी मुंबई, दि. २६ :

नवी मुंबई लगत असणाऱ्या तुर्भे एमआयडीसीतील एका रासायनिक उत्पादन कंपनीत आग लागली आहे. रासायनिक उत्पादन असल्याने आग काही क्षणात फोफावली आणि आगीने रौद्र रूप धारण केले आहे. तुर्भे एमआयडीसीतील इंदिरानगर भागात असणाऱ्या रेशमा ओर्गेनिक केमिकल्स हि कंपनी आहे.

भूखंड क्रमांक डी ६९ वर असणाऱ्या या कंपनीत आज पहाटे भीषण आग लागलेली आहे. याबाबत वाशी अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार सकाळी चार वाजून सदोतीस मिनिटांनी त्यांना कॉल आला. त्यांनी तातडीने नेरुळ एमआयडीसी अग्निशमन दलास याबाबत माहिती दिली. त्या नंतर पाच मिनिटात नेरुळ अग्निशमन दल घटनास्थळी पोहचले. त्यांनी आग विझवण्याचे प्रयत्न सुरु केले, मात्र रासायनिक कंपनी असल्याने अनेक ज्वालाग्राही पदार्थ तेथे होते.


महाराष्ट्र शासन

**अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय**

जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :-addcollmumbai@gmail.com

**जाहिर नोटीस**

सयरुन्नीसा असगरअली शेख ..... अपिलार्थी
---- विरुध्द ----
सहायक महापालिका आयुक्त जी/दक्षिण विभाग व इतर ६ ..... प्रतिवादी
प्रति,
१. ललीता विनायक तल्ला, ..... (प्रतिवादी क्र. ४)
२. श्रीधर विनायक तल्ला, ..... (प्रतिवादी क्र.५)
३. श्रीकांत विनायक तल्ला, ..... (प्रतिवादी क्र.६)
४. पेंतम्मा पुंडलिक तल्ला, ..... (प्रतिवादी क्र.७)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१. येथे झोपडीवर पात्रतेकरणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी क्र. ०४,०५,०६ व ०७ केले आहे. प्रकरणी दि. १०.०७.२०२५ रोजी मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.०७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ०४,०५,०६ व ०७ असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित सुनावणी दि. २८.०७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित/हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर



महाराष्ट्र शासन

**अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय**

जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्र.:- ०२२- २२६१००१३ ई-मेल :-addcollmumbai@gmail.com

**जाहिर नोटीस**

जमील अहमद शेख .......... अपिलार्थी
---- विरुध्द ----
सहायक आयुक्त महापालिका जी/दक्षिण विभाग व इतर ५ ..... प्रतिवादी
प्रति,
१. हलीमुन्नीसा अहमद वकिल खान ..... (प्रतिवादी क्र. ३)
२. जामुने देवम्मा मरीअप्पा .... (प्रतिवादी क्र. ४)
३. मोहम्मद इलियास शेख .... (प्रतिवादी क्र.५)

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा.अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१. येथे झोपडी पात्रतेकरणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी केलेले असुन अपिलार्थी यांनी आपला पत्ता माहित नसल्याचे पत्रान्वये कळविलेले असल्याने पुढील सुनावणीबाबत आपणास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३६ (३) अन्वये एका स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करुन कळविणेत येत आहे.

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित सुनावणी दि. २८.०७.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित/हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

सहाय्यक महसुल अधिकारी
अपर जिल्हाधिकारी कार्यालय,
मुंबई शहर

## घोडाझरी तलावाचे नहर नादुरुस्त

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २६ जुलै :** नागभीड तालुक्यातील घोडाझरी तलाव आणि जुन्या काळात इंग्रज सरकारने बांधलेला तलाव आणि नहर शेवटची घटका मोजत असल्याचे दिसून येत आहे.नागभिड येथील घोडाझरी तलावातून नागभीड , तळोधी, नेरी येथील पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहे. मात्र त्या ठिकाणी विंधन विहिरी बांधण्यात आल्या त्याकरिता त्या ठिकाणी विहीर पाणी साचून पुढील शहराकरिता जो पाणी पुरवठा कूपनलिका तयार आहेत त्यातून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. तसेच तलावातील गाळ गेल्या कित्येक वर्षांपासून काढला गेला नाही तसेच नह ाची दुरुस्ती ही थातुरमातुर केली जाते.

## जोरदार ब्लास्टींगमुळे घर पडले

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. २६ जुलै :** तालुक्यातील केपीसीएल खुल्या खाणीच्या ब्लास्टिंगमुळे बरांज (मो) येथील घराची छत कोसळल्याची घटना दिनांक २० रोज रविवारला दुपार दरम्यान घडली. मंगला बबनराव रणदिवे घर क्रमांक १४१ रा. बरांज (मो) असे घर मालकाचे नाव आहे . घरात ऐकून ६ सदस्य राहत असून कुटुंब आतील घरात असल्याने मोठी जीवित हानी टळली.बरांज (मो) येथील गावाचे पुनर्वसन झाले नाही मात्र संपूर्ण केपीसीएल कोळसा खाणीने गावाला वेढा घेतला आहे. त्यातच कोळसा उत्खनासाठी खाणीत मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात असते.

# सावली व नागभीड तालुक्यात अतिवृष्टी

### आतापर्यंत जिल्ह्यात ५६५.८ मीमी पावसाची नोंद, संततधार पावसाने जिल्हा जलमय

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि. २६ जुलै :** हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार मागील तीन चार दिवसापासून संतत संततधार पाऊस सुरू आहे. मागील दोन तीन दिवसात जिल्ह्यातील काही तालुक्यात अतिवृष्टी झाली तर सर्व तालुक्यात संततधार पाऊस सुरू आहे. शनिवारी (दि.२६) सावली ६९.३ तर नागभीड ६९.९ मीमी एवढ्या अतिवृष्टी पावसाची नोंद झालेली आहे. मागील तीन चार दिवसापासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे जिल्ह्यात सगळीकडे जलमय परीस्थीती निर्माण झालेली आहे.

चिमूर तालुक्यातील गोंदेडा खांबाडा व वडसी विहीरगाव मार्ग




पुरामुळे बंद झालेले आहेत.

जुलै महीन्याच्या सुरूवातीस जिल्ह्यात दमदार पावसाने हजेरी लावली. मात्र त्यानंतर दहा बारा दिवस पावसाने दडी मारलेली होती. परीणामी जिल्ह्यातील शेतीची कामे खोळंबलेली होती. मात्र मागील तीन चार दिवसापासून पडत असलेल्या पावसामुळे आता जिल्हा सर्वत्र जलमय झाल्याची परीस्थीती पहायला मिळत आहे. जिल्ह्यातील काही भागात मागील तीन चार दिवसात अतिवृष्टीची नोंदही आहे. त्यामुळे अतिमुसळधार पाऊस पडलेल्या ठिकाणी जनजिवन विस्कळीत झाल्याचे दृश्यही पहायला मिळत आहेत. हवामान विभागाने (दि.२५) ला चंद्रपूर जिल्ह्यात अतिमुसळधार पावसासाठी रेड अलर्ट घोषीत केला. मात्र जिल्ह्यात सर्वत्र संततधार पाऊस पडला. हवामान विभागाच्या अंदाजानुसार जिल्हाधिकारी यांनी शुक्रवारी सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली. मात्र सुट्टी व्यर्थ गेल्याचे नागरीकांतून बोलल्या जात आहे.

जिल्ह्यात जून महीन्यात सरासरीच्या ८२.९ टक्के पाऊस पडले तर जुलै महीन्यात आतापर्यंत सरासरीच्या १३८ टक्के पावसाची नोंद झालेली आहे. तर एकूण यंदा सरासरीच्या ११७.१ टक्के पाऊस पडलेला आहे. आतापर्यंत सर्वात सरासरीच्या सर्वात जास्त १७५.३ टक्के एवढ्या विक्रमी पावसाची नोंद जिवती तालुक्यात झालेली आहे. तर सर्वात कमी पावसाची नोंद ८२.८ टक्के गोंडपिपरी तालुक्यात झालेली आहे. त्यापाठोपाठ वरोरा व राजूरा तालुक्यात झालेली आहे. येथे सरासरीच्याही कमी पाऊस पडलेले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत अनेक तालुक्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे. तर मागील तीन चार दिवसापासून संततधार पडत असलेल्या पावसामुळे सर्वत्र जलमय परीस्थिती निर्माण झाली असल्याचे पहायला मिळत आहे.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांनी साताऱ्याचा मानसन्मान ठेवला

### मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी काढले गौरवोद्गार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि. २६ जुलै :** छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं आधी आपण लंडनला जाऊन बघायचे अन् परत यायचो. ते भारतात आणण्याचे काम आ.सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ही वाघनखं त्यांनी पहिल्यांदा सातारा येथे आणली. सातारा ही मराठ्याची राजधानी होती. भाऊंनी सातारकरांचा मानसन्मान ठेवला. नाहीतर ही वाघनख ते पहिले नागपूरलाही घेऊन जाऊ शकले असते, तो त्यांचा अधिकारही होता. पण त्यांनी आधी साताऱ्याची ओळख ठेवली. मग वाघनखांचा पुढचा प्रवास सुरू झाला. सातारकर म्हणून आम्हाला सुधीरभाऊंबद्दल प्रचंड आदर आहे, असे गोरवोद्गार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व लातूरचे पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी काढले.

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे शनिवारी (२६ जुलै) चंद्रपूर येथे आगमन झाले.

यावेळी त्यांनी राज्याचे माजी मंत्री आमदार



सुधीर मुनगंटीवार यांच्या निवासस्थानी भेट दिली. आ.मुनगंटीवार यांनी आपल्या परिवाराच्यावतीने आणि चंद्रपूरकरांच्यावतीने त्यांचे जोरदार स्वागत केले.

या प्रसंगी आ.मुनगंटीवार परिवाराकडून बांबूपासून साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती आणि लाकडापासून तयार केलेली तलवार देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी ते बोलत होते.

ना.शिवेंद्रराजे पुढे म्हणाले, सुधीरभाऊ फक्त आमदार किंवा माजी मंत्री नाहीत, तर ते आमचे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात आम्ही सर्व जण राज्यात काम करतोय. त्यांचे स्थान आमच्या सर्वांच्या दृष्टीने फार वरचे आणि महत्वाचे आहे. मी सुधीरभाऊंएवढा दांडगा अभ्यास आणि वक्तृत्व शैली आजवर बघितली नाही. इतिहास आणि वर्तमान स्थितीचा अभ्यास, प्रत्येक विषयाची आकडेवारीनिशी अचूक माहिती, हे भाऊंकडे बघूनही शिकणे शक्य नाही. आपण फक्त प्रयत्न करू शकतो. सुधीरभाऊंकडे बघून जेवढे शिकता येईल, तेवढे शिकण्याचा माझा प्रयत्न असतो. सुधीरभाऊ कुठल्या मंत्र्यांकडे, अधिकाऱ्याकडे किंवा एखाद्या विभागातही गेले. तरी सगळे अलर्ट मोडमध्ये येतात. भाऊंना काहीही उत्तर देऊन चालत नाही. जे कायद्यात असेल तेच त्यांना पाहिजे. विधानसभेतही आम्ही बघितलं की सरकारची, मंत्र्यांची चुकही ते दाखवतात, असे ना.शिवेंद्रराजे यांनी सांगितले.

# डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे पालक-शिक्षक सभा संपन्न



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २६ जुलै :** डॉ.आंबेडकर विद्यालय ब्रह्मपुरी,येथे पालक- शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते.पालक- शिक्षक सभेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक व्ही.डब्ल्यू. नन्नावरे साहेब,पालक-शिक्षक सभेचे उपाध्यक्ष गोवर्धनजी बागडे , विद्यालयाच्या पर्यवेक्षिका कुमारी.ए.बी. शेळकी मॅडम,प्रमुख अतिथी सौ.लोणारे मॅडम,सौ. मेश्राम मॅडम,तसेच श्री. सांगोळे साहेब,उपस्थित होते.

सर्वप्रथम भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, दलितांचे कैवारी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले. या थोर महान पुरुषांच्या प्रतिमांना मेणबत्ती, अगरबत्ती, दीप-प्रज्वलित,पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पालक शिक्षक समितीचे प्रमुख यु.पी. राठोड ,यांनी मागील सभेचा इतिवृत्त याचे वाचन करून सांगितले.

त्यानंतर पालक-शिक्षक सभेचे उपाध्यक्ष यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक नव्हे तर पालक आणि विद्यार्थी यांनी सुद्धा स्वतः लक्ष दिले पाहिजे. आणि पालकांना आपल्या पाल्याविषयी स्वतः जागृत राहायला पाहिजे.असे मोलाचे मार्गदर्शन केले.त्यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक साहेबांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये उपस्थित असलेल्या पालकांसोबत संवाद साधले व चर्चा करून पाल्यांना मोबाईल पासून दूर ठेवणे,त्यांचे गृहकार्य, स्वाध्याय,नेहमी तपासत राहावे. जेणे-करून आपला पाल्य विद्यालयात दिलेला गृहकार्य-स्वाध्याय पूर्ण करतो.की,नाही,हे आपल्याला कळते.असे

मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला बहुसंख्य माता-पालक,विद्यालयातील शाळा-प्रमुख,शाळा उपनायक,विद्यार्थिनी प्रतिनिधी तसेच विद्यालयातील शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन .यू.पी.राठोड सर तर आभार कु.राजूरकर मॅडम यांनी केले.शेवटी अल्पोहार घेतल्यानंतर विद्यालयाच्या परिसरात पालक शिक्षक सभेचे पदाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# एल. अँड. टी. कामगार संघाने मिळवून दिली मृत कामगाराच्या कुटुंबाला १६ लाखांची आर्थिक मदत

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. २६ जुलै :** अल्ट्राटेक सिमेंट कंपनी आवाळपूर येथील एल. अँड टी. कामगार संघाच्या मागणीवरून प्रेरणा कन्स्ट्रक्शन या ठेकेदार कंपनीने प्रकृतीत बिघाड होऊन मृत झालेल्या सुभाष फुलचंद शेंडे यांच्या कुटुंबास १६ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. ही मदत एल अँड टी कामगार संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाली आहे.

सुभाष शेंडे यांचा मृत्यू कामावर नसताना झाला असतानाही, सामाजिक उत्तरदायित्व म्हणून एल. अँड टी. कामगार संघाचे अध्यक्ष माजी



खासदार नरेश पुगलिया यांच्या मध्यस्थीने व कार्याध्यक्ष शिवचंद्र काळे यांच्या नेतृत्वात ही मदत देण्यात आली. यामध्ये १५ लाख रुपये थेट कुटुंबास धनादेशाद्वारे देण्यात आले असून, अंत्यविधी व इतर कार्यासाठी एक लाख रुपये एकूण १६ लाख रुपये देण्यात आले. एक लाख रुपये वैद्यकीय खर्च प्रेरणा कन्स्ट्रक्शनने वेगळे केले आहेत.

मृत सुभाष यांच्या ठिकाणी त्यांची मोठी बहीण उज्वला उमाजी वाकडे यांना कामावर घेण्यात येणार आहे. कामगार संघाच्या कार्यालयात शुक्रवारी या मदतीचा धनादेश कुटुंबाकडे आईचे नावे सुपूर्त करण्यात आला. यावेळी संघाचे पदाधिकारी नरेंद्र पांडे, गजानन बोडेकर, जनार्दन ढोले, बंडू उरकुडकर कामगार संघाचे इतर पदाधिकारी व कामगार उपस्थित होते. ही मदत प्राथमिक स्वरूपाची असून, लवकरच ग्रॅज्युएटी, पीएफ व इन्शुरन्स कंपनीकडून सुमारे ५ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम कुटुंबास मिळण्याची शक्यता आहे.असे शिवचंद्र काळे कार्याध्यक्ष एल अँड टी कामगार संघ यांनी सांगीतले.

कामगार संघाने दाखवलेली संवेदनशीलता आणि प्रेरणा कन्स्ट्रक्शनने घेतलेली जबाबदारी समाजात एक सकारात्मक संदेश देणारी बाब ठरली आहे. घरातील करता व अविवाहित मुलगा मरण पावल्याने कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले. या मदतीमुळे कुटुंबाला आधार मिळाला आहे.

# डम्पिंग यार्ड येथे तारांच्या जाळीत अडकलेल्या अजगरास जिवनदान

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि. २६ जुलै :** आज दिनांक २६ जुलै ला सायंकाळी ११ च्या दरम्यान डम्पिंग यार्ड अष्टभुजा येथे तेथील काम करणारे कामगारांना जाळीत अडकलेला अजगर साप दिसला. तेथील कामगार मनिष उराडे यांनी हॅबिटेट कॉन्सर्वेशन सोसायटीचे सर्पमित्र साईनाथ चौधरी यांना फोन करून साप आल्याची माहिती दिली. लगेच सर्पमित्र साईनाथ चौधरी व विशाल मडावी, रणजीत मडावी, अनिकेत वनकर घटना स्थळी पोहचले पाहणी केली असता अजगर जातीचा साप ११ फूट लांबीचा होता. जाळीत अडकलेल्या अजगरास जाळी कापुन त्या अजगरास कुठलीही इजा न होता त्याला पकडले व वनविभागात त्याची नोंद करून लोहार



जंगलात सुखरूप सोडण्यात आले. त्यावेळी हेबिटेट कॉन्सर्वेशन सोसायटी चे सदस्य साईनाथ चौधरी, विशाल मडावी, अनिकेत वनकर उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**

**नागपूर आणि बल्लारशाह स्टेशनवर केटरिंग स्टॉल्सची तरतूद**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, मध्य रेल्वे, नागपूर येथील वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक यांनी ऑनलाइन ई-निविदा अ१ आणि अ श्रेणी स्थानकांवरील केटरिंग स्टॉल्सवर केटरिंग स्टॉल सेवांच्या तरतुदीसाठी दोन पॅकेट निविदा प्रणालीमध्ये पात्र निविदाधारकांकडून मागवल्या आहेत म्हणजेच नागपूर आणि बल्लारशाह स्टेशन जीएमयू नागपूर विभागात ५ वर्षांच्या कालावधीसाठी, ज्याची माहिती खालीलप्रमाणे आहे : अ. क्र. १ स्टेशन: नागपूर स्टेशन वर्ग: अ१. स्टॉलचा प्रकार: केटरिंग स्टॉल. स्थान: मुंबई येथील पीएफ क्रमांक ४/५ स्टेशनवरील योग्य ठिकाणी समाप्त. राखीव: जनरल. अ. क्र. २ स्टेशन: बल्लारशाह स्टेशन कॅटग.: अ. स्टॉलचा प्रकार: केटरिंग स्टॉल. स्थान: स्टेशनवरील योग्य ठिकाणी पीएफ केंद्रावर पीएफ क्रमांक १. राखीव: जनरल. निविदांची सर्व माहिती https://ireps.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे. सर्व निविदा फक्त ऑनलाइन सादर करायच्या आहेत. निविदा मॅन्युअली सादर केल्या जाणार नाहीत/विचारात घेतल्या जाणार नाहीत. https://ireps.gov.in वर लॉगिन आणि ऑनलाइन निविदा सादर करण्यासाठी डीएससी वर्ग-३ (वर्ग-३ चे डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र) आवश्यक आहे. राखीव किंमत, ईएमडी, निविदा कागदपत्राची किंमत इत्यादींची माहिती https://ireps.gov.in येथे उपलब्ध आहे. ऑनलाइन निविदा कागदपत्रांची अंतिम तारीख: १८/०८/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत. निविदा कागदपत्रे ऑनलाइन सादर करण्याची तारीख आणि वेळ: १८/०८/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत. ई-निविदा ऑनलाइन उघडण्याची तारीख आणि वेळ: १८/०८/२०२५ रोजी १५.३० वाजता. कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणतीही निविदा रद्द करण्याचा अधिकार रेल्वे प्रशासन राखून ठेवत आहे.

वरिष्ठ डीआरएम/नागपूर

ई-निविदा सूचना क्रमांक: एनजीपी/सी.१८३/सी/एनआयटी/२०२३ दिनांक २५/०७/२०२५

रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे**

**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय अभियंता (सह)/एस.ई.सी.आर. नागपूर खालील कामांसाठी ई-टेंडर आमंत्रित करत आहेत

**अनु. क्र. 1. निविदा सूचना क्रमांक एस/10/एनजीपी/2025-2026**

**कामाचे नाव:** 1) एडीईएन (वर्क्स)/नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात "माउंट रोड नागपूर येथील 800 केव्हीए सबस्टेशनच्या विस्ताराच्या" संदर्भात स्थापत्य अभियांत्रिकी काम. (2)एडीईएन (वर्क्स)/नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात मोतीबाग वर्कशॉप नागपूर येथील व्हील शॉपच्या व्हॅली गटाराची आणि बायो टॅंक मॅन्युफॅक्चरिंग शेडची बदली.

**अंदाजे निविदा मूल्य:** रु. 1,03,11,740/- **बोली सुरक्षा:** रु. 2,01,600/-

**अनु. क्र. 2. निविदा सूचना क्रमांक एस/11/एनजीपी/2025-2026**

**कामाचे नाव:** एडीईएन/नागभीरच्या अधिकार क्षेत्रात रॅम्पची तरतूद, निसरडा नसलेला प्रवेश मार्ग, पिण्याच्या पाण्याचे बूथ, कमी उंचीचे तिकीट काउंटर, पॅसेंजर हॉल्ट स्टेशन इमारतीच्या प्रवेशद्वारावर रॅम्प आणि पॅसेंजर हॉल्ट येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच प्लॅटफॉर्मच्या टोकांवर आंतर-प्लॅटफॉर्म हस्तांतरणासाठी मार्ग.

**अंदाजे निविदा मूल्य:** रु. 4,27,92,233/- **बोली सुरक्षा:** रु. 3,64,000/-

**अनु. क्र. 3. निविदा सूचना क्रमांक एस/12/एनजीपी/2025-2026**

**कामाचे नाव:** (1) राजोली, नागभीर, देवळगाव, गोंगले, ब्रह्मपुरी आणि वडसा स्थानकांवर ओव्हरहेड पाण्याच्या टाक्यांची तरतूद (2) मुलमरोडा स्थानकावर 50,000 लिटर क्षमतेच्या आरसीसी ओव्हरहेड टॅंकचे बांधकाम (3) एडीईएन/एनएबीच्या अधिकार क्षेत्रात गोंगले स्थानकावर ट्रॅक मशीन कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती कक्ष, शौचालय, पाणीपुरवठा यांची तरतूद.

**अंदाजे निविदा मूल्य:** रु. 2,80,38,362/- **बोली सुरक्षा:** रु. 2,90,200/-

वरील सर्व निविदांसाठी बोलीदार त्यांच्या मूळ/सुधारित बोली **14.08.2025 च्या 15.00 वाजेपर्यंतच** सादर करू शकतील. मॅन्युअल ऑफरना परवानगी नाही. तपशील आमच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत: www.ireps.gov.in

विभागीय अभियंता (दक्षिण)
द.पू.म. रेल्वे नागपुर

AAA/16/79

स्वच्छ भारत अभियान
एक कदम स्वच्छता की ओर

# मूल येथील सुदर्शन शेंडे यांना पीएचडी (डॉक्टरेट)

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. २६ जुलै :** मूल येथील टीचर कॉलोनी मधील विद्यार्थी सुदर्शन मनोहर शेंडे यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून कृषिविद्या (Agronomy) विषयात पीएच.डी. (डॉक्टरेट) पदवी प्राप्त केली आहे.

सुदर्शनचे वडील सेवानुवृत्त प्राथमिक शिक्षक असून त्याचे प्राथमिक शिक्षण जि. प. प्राथ. शाळा, विहीरगाव (मूल) येथे झाले. इयत्ता पाच ते दहावी पर्यंतचे शिक्षण मूल येथील नवभारत विद्यालयात झाले. इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण विद्या निकेतन, चंद्रपूर येथून पूर्ण केले. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत रामकृष्ण बजाज कृषी महाविद्यालय, वर्धा येथून बी. एससी. (कृषी) पदवी प्राप्त केली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महराज कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथे



कृषिविद्या (Agronomy) विषयात एम. एससी. (कृषी) पूर्ण केली. पुढे म.फु.कृ.वि. राहुरी येथील डॉ. यु. एस. सुर्वे, प्राध्यापक, कृषिविद्या विभाग, म.फु.कृ.वि. राहुरी यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिविद्या (Agronomy) या विषयात पीएच.डी. (डॉक्टरेट) पूर्ण केली. पीएच.डी (डॉक्टरेट) साठी शेडनेटखाली वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीत (मृदा प्रकारात) पिकवलेल्या आल्यावर खत आणि पाणी व्यवस्थापनाच्या (फर्टिगेशन) विविध स्तरांचा आणि कालावधीचा होणारा परिणाम या पीएचडी प्रबंध विषयामध्ये सुदर्शन ने संशोधन केले. या दरम्यान राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेली नेट (NET-National Eligibility Test) उतीर्ण केली. सध्या तो राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथे साहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. या यशामध्ये आई-वडील, बहिण, मित्रवर्ग यांचे प्रोत्साहन व गुरुवर्य यांचे मार्गदर्शन लाभले त्यामुळे हे यश संपादन करता आले अशी प्रतिक्रिया सुदर्शन यांनी दिली.

# भाजपा शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी जाहीर केली शहर कार्यकारिणी

### शहर सरचिटणीस पदी मनोज भुपाल व पवन जयस्वाल यांना संधी.

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २६ जुलै :** भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहर अध्यक्ष पदी नुकतीच प्रा. सुयोग बाळबुधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माजी आमदार, भाजपा नेते प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष हरीश शर्मा यांच्या सहमतीने ब्रह्मपुरी शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी आपली ब्रह्मपुरी शहराची कार्यकारिणी जाहीर केली आहे.

यामधे भाजपा शहर सरचिटणीस पदी मनोज भूपाल व पवन जयस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा शहर उपाध्यक्ष पदी प्रशांत वसाके, संजय बावणकुळे, उत्तम उरकुडे, रेहमान पठाण, गीताताई जांभुळे, छायाताई वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे. तर शहर सचिव पदी मनीष पटेल, प्रकाश कूथे, अनवर शेख, पुष्पा गराडे, वर्षा जोशी, प्रतिभा भोयर. शहर कोषाध्यक्ष पदी प्रा. विनय दडमल यांना संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य पदी इंजी. अरविंद नंदुरकर, मनोज वठे, विक्रम कावळे, साकेत भानारकर, जयप्रकाश अंडेलकर, डॉ. सतीश कावळे, विलास विखार, गौरव भैया, नितीन आंबोरकर, क्रीष्णा वैद्य, रितेश दशमवार, प्रमोद बांगरे, सागर हर्षे, अरविंद कुंभारे, राकेश वैद्य, साहदेव भानारकर, राकेश वेलथरे, संजय अंबोरकर, जगदीश भषाखेत्रे, सुधाकर ठेंगरी, दिलीप पिलारे, प्रमोद राऊत, लोकेश भर्रे, ईश्वर प्रधान, विनायक दुफारे, अशोक हटवार, रवी वानखेडे, रमेश नवघडे, राजेश उरकुडे, अभिजित बच्चूवार यांची नियुक्ती झाली असून महिलांमधून डॉ. हेमलता नंदुरकर, सौ. विभा सुभेदार, श्रीमती नलिनी बगमारे, अर्चना बावनकुळे, रेखा कामडी, वर्षा सहारे, प्रियांका रोकडे, रुपाली चौधरी, सुनीता कावळे, लताताई गायकवाड, गीता गोन्नाडे, वैशाली कुंभारे, लता नाकतोडे, ललिता कामडी यांची निवड करण्यात आली आहे. शहरातील भौगोलिक व सामाजिक दृष्टीने कार्यकारिणी तयार केली असून नव्या उमेदीच्या व्यक्तींना यात संधी देण्यात आली आहे. शहर कार्यकारिणी मधील सर्व नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांचे भाजपा नेते माजी आमदार प्रा. अतुल देशकर, प्रदेश परिषद सदस्य प्रा. कादर शेख, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे, भाजपा जिल्हा सचिव रश्मी पेशने खानोरकर, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, प्रा. अशोक सालोटकर, प्रकाश लोखंडे, वर्षा चौधरी, अमित रोकडे, स्वप्नील अलगदेवे, प्रा. चंद्रकात विटाळकर, प्रा. संजय लांबे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

# घुग्घुस येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतर्फे जनविश्वास सप्ताह




**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस,दि. २६ जुलै :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त २२ ते ३० जुलैपर्यंत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे चंद्रपूर तालुकाध्यक्ष श्रीनिवास गोसकुला यांच्यातर्फे जनविश्वास सप्ताहाचे आयोजन गांधीनगर येथे करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे चंद्रपूर विधानसभा अध्यक्ष सुनिल काळे यांचा दुर्गा महिला मंडळाच्या अध्यक्षा राजेश्वरी पोगुल्ला, राधा सिरसिल्ला, राजीनीति नगम्मा, श्यामाला तोटा, कमलाताई व महिलांच्या वतीने उपस्थित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच केक कापून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुंडलिक खनके, शहर अध्यक्ष रवि डिकोंडा, अक्षय कोवले, योहान ईरगुराला, गोविंद झाडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या महिला, भगिनींचे आभार व्यक्त करण्यात आले.

**वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड**
(कोल इंडिया लिमिटेडचा एक उपक्रम)
कोल इस्टेट, सिविल लाईन्स, नागपुर-440001, महाराष्ट्र, भारत, वेबसाईट www.westerncoal.in

**सूचना**

वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडच्या बल्लारपुर क्षेत्रा अंतर्गत गौरी – पौनी विस्तार खुली खाणं, प्रकल्प क्षेत्र 1296.42 हे. व उत्पादन क्षमता 3.50 मिलियन टन प्रति वर्ष साठी पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाद्वारे पर्यावरण स्वीकृती दुरुस्ती पत्र क्रमांक J-11015/242/2008-IA-II(M), दिनांक 23.07.2025 अनुसार पर्यावरण स्विक्रुती दिली आहे. पर्यावरण स्विक्रुतीच्या पत्राची प्रत पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या खाली दिलेल्या वेबसाईट वर पाहु शकता:–

http://environmentclearance.nic.in



महाराष्ट्रातील बेरोजगारी संपली, महागाई तर आता निव्वळ आटोक्यात आली असेच म्हणावे लागेल. शेतकरी तर कमालीचे संपन्न झाले. जनतेत सर्वत्र आनंदी आनंदच आहे. मोफत शिक्षणाने तर घरोघरी शिक्षण संपत्ती दिली, खरंच महाराष्ट्राचा संपन्न झाला. कुठलीच समस्या उरली नाही. जनतेला कुठलाच प्रश्न सतावत नाही. तर मग आता कशाला अधिवेशन हवे आणि कशाला हव्यात निवडणुका ? आता राजकारणी माणसं, मंत्री, आमदार यांना देखील काहीच कामधंदे उरले नाही, म्हणूनच की काय आता आमदार आणि मंत्री हे वेगळ्या स्पर्धेत उतरत आहेत. एक मंत्री सभागृहात कामकाज सुरू असताना चक्क तंबाखू चोळून देतो. तर दुसरा मंत्री तो तंबाखू हातात घेऊन त्यावरती दोन फटके मारून तोंडात भरतो. एक मंत्री तर जादूटोण्याच्या इतका नादी लागला की 'होम फट स्वाहा' या शिवाय त्यांना काही सुचतच नाही. एक मंत्री तर विरोधकांना आव्हान देताना 'बाहेर भेट मग तुला दाखवतो' असे बाणेदार (?) उत्तर देतो. त्यानंतर दुसरे मंत्री सभागृहात कामकाज सुरू असताना मोबाईल पहात बसले, एक मंत्री तर सिगारेटचा 'कश' मारत 'कॅश' दाखवत आपला आनंद व्यक्त करतो. तर एक आमदार तर चक्क आझाद मैदानात कुस्ती करणार आहे. अगदी पिक्चरच्या डायलॉग प्रमाणे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी 'जगह तेरी, दिन तेरा, वक्त भी तेरा' असं म्हणत शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांना मैदानात कुस्तीसाठी ऑफर देत आहे. हॉटेलमधील एका वेटरला आ. गायकवाड यांनी केलेली फ्रीस्टाइल मारहाण पाहून जलील यांनी माघार घ्यायला हवी होती. पण आता त्यांच तरी काय चुकलं? आता त्या आमदारांना काहीच काम शिल्लक राहीले नाहीत. कारण जनतेचे प्रश्न संपले आहे. बर आमदार अन माजी खासदारांमध्ये अगदी फिल्मी स्टाईलने करार देखील झाला. तो करार म्हणजे आपण दोघांनीही पक्ष, धर्म, नातेवाईक आणि आपले कार्यकर्ते यांना सोबत घ्यायचं नाही. त्याबरोबरच कुठलंही अस्त्र, शस्त्र, दगड याचा वापर न करता थेट फायटिंग साठी मैदानात उतरायचं. बर आता पोलीस प्रशासनाला देखील काहीच काम उरलं नाही. त्यामुळे या दोघांनी मिळून पोलिसांनाही सांगितलं की, आमच्या मध्ये तिसरा कोणी येणार नाही याची पोलिसांनी दक्षता घ्यावी. दोघांचं बरं वाईट झाल्यास जबाबदारी आमच्या दोघांचीच राहील आणि आता आपण थेट आझाद मैदानात भेटू. खरंच महाराष्ट्रातील जनतेला देखील हेच अपेक्षित होतं. आमदार निवास मधील आकाशवाणीच्या कॅन्टीनमध्ये टॉवेल आणि बनियनवरती केलेली बॉक्सिंग पाहून आता माजी खासदार इम्तियाज जलील यांनी देखील याच पठ्ठ्याला थेट बुलढाण्यात जाऊन चॅलेंज केलं आणि आमदार साहेबांनी देखील माजी खासदारांचे चॅलेंज घेत त्यांच्या आव्हानाला प्रतिउत्तर दिल. आता जनतेला अपेक्षा आहे ती रोहित पवार आणि माणिकराव कोकाटे यांच्या कुस्तीची. त्यानंतर संजय राऊत यांच्यासोबत कोण उतरणार ? त्याचबरोबर राहुल गांधी आणि नरेंद्र मोदी यांची कुस्ती पाहण्यासाठी देखील जनता आतुर आहे. अशा प्रत्येक सत्ताधारी आणि विरोधी पक्षात बसलेल्या नेत्यांच्या कुस्त्या आता ह्याच महाराष्ट्रातील जनतेला बघायच्या आहेत. टीव्ही चॅनलला देखील आता बातम्या दाखवण्यासाठी काहीतरी वेगळा मसाला मिळेल आणि जनतेला यातून समाधान. 'कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा' हे स्लोगन आता जुने झाले असून 'बरोबर आणून ठेवलात महाराष्ट्र माझा' हे स्लोगन आता वापरावे लागेल.



# कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा?

एक काळ असा होता जेव्हा आर. आर. पाटील यांनी धाडसी निर्णय घेत संपूर्ण महाराष्ट्रात डान्स बार बंदी घातली होती. तेव्हा वर्तमानपत्रांत मथळे झळकले होते एकच स्टार आर आर. त्या निर्णयाविरोधात डान्स बार चालकांनी कोट्यवधींची रक्कम जमा करून तत्कालीन मुख्यमंत्र्यांना लाच देण्याचाही प्रयत्न केला होता. पण आबांनी न डगमगता, न वाकता आपली भूमिका कायम ठेवली. आणि आज?

आजचे गृहमंत्री, जे स्वतः मुख्यमंत्री आहेत देवेंद्र फडणवीस. त्यांच्या मंत्रिमंडळातील गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याच कुटुंबाच्या नावे डान्सबार चालवले जात आहे, हे समोर येते. हा विरोधाभास नव्हे का? एकीकडे पोलीस खातं तुमच्या अधिपत्याखाली आहे आणि दुसरीकडे तुमच्याच राज्यमंत्र्यांचे डान्सबारचे व्यवसाय चालू आहेत? हा बदल आहे का? की मूल्यांची घसरण? आर. आर. आबांनी ज्या समाजसुधारणेचा पाया घातला, तोच आजच्या सत्ताधाऱ्यांच्या पायाखालून का सरकतोय? जनतेला याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल.

एकेकाळी ज्या व्यवसायाला बंदी होती, आज तोच व्यवसाय राज्याचा मंत्रीच चालवतो. महाराष्ट्रात नेमके काय चाललंय हे सध्या कुणालाच कळत नाही. सत्ताधारी असो वा विरोधक, दोघांचेही कारभार सारखेच चालू असलेले दिसतात. आता एक शंकर मांडेकर नावाच्या आमदाराचा भाऊ चक्क गोळीबार करतो. एक आमदार मारामारीचे करार पत्र तयार करून माजी खासदाराला आव्हान देतो.

कृषीमंत्री तर रोज विक्रम करतायेत. गृहराज्यमंत्र्याचा डान्स बार निघतोय. आमदारांची अंदाज समिती मुक्कामाला असलेल्या विश्रामगृहात कोट्यवधी रुपये सापडतात. मुंडे खून प्रकरणातील माजी मंत्र्याचे समर्थक सापडेनात. विधिमंडळाच्या पोर्चमध्येच आमदारांच्या समर्थकांमध्ये जोरदार मारहाण होते. विधीमंडळ आवारात एक आमदार दुसऱ्याला शिव्या देतोय. आजपर्यंत महाराष्ट्रात कर्जासाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. दिवसाला सरासरी आठ आत्महत्या या शेतकऱ्यांच्या होत आहेत. तरी याकडे ना समाज ना सरकार गांभीर्याने घ्यायला तयार आहे.

आता तर ठेकेदारही आत्महत्या करू लागले. हर्षल पाटील या युवा कंत्राटदाराने अवघ्या ३९ व्या वर्षी जलजीवनच्या काम केलेल्या योजनेचे शासनाकडून येणे आहे, म्हणून मृत्यूला कवटाळले. आजपर्यंत शेतकरी आत्महत्या करत असताना त्याकडे केवळ बातम्या म्हणून पाहणाऱ्या समाजाला हर्षल पाटील या युवकाने केलेल्या आत्महत्येमुळे, झोपेतून सोंग घेतलेल्या समाजाने जागे होण्याची वेळ आली आहे.

यामध्ये केवळ हर्षलच आहे असे नाही. अनेक नवनवीन कंत्राटदार हर्षल प्रमाणेच खाजगी सावकारांकडून तसेच स्थावर मालमत्तेवर कर्ज काढून सरकारची कामे करत आहेत. हर्षलने देखील असेच खाजगी सावकारांकडून कर्ज काढून कामे करून भविष्यात चांगले जीवन जगण्यासाठी धडपड सुरू केली होती. एका माहितीनुसार कंत्राटदार तर केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. त्यांचीच देणी जर अर्थसंकल्पाच्या बारा टक्के असतील, तर इतर देणी कशातून भागवायची? असा प्रश्न सरकार समोर असेल.

याकरिता सरकारने जसे साखर कारखानदारांच्या कर्जाची हमी घेतलेली असते, तसीच हमी शेतकऱ्यांच्या व काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या कर्जाची घेतली पाहिजे. जेणेकरून सरकारकडून पैसे आल्यानंतर शेतकरी अथवा कंत्राटदार कर्ज भागवतील. अनेक आमदार खासदारांच्या भ्रष्टाचारामुळे कारखानदार कारखान्यावरती कर्ज काढून, तो कारखाना कर्जात दाखवून बँकांकडून कर्ज घेत असतात. या कर्जाची थकहमी राज्य सरकारने घेतलेली असते.

उद्या जर का या कारखान्यांनी कर्ज नाही फेडले, तर ते राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातून आपोआप बँकांकडे वसूल होत असते. शिवाय कारखानदारांचे पैसे तर सरकारकडे नसतात. परंतु बेरोजगारी घालवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांची मुले वेगवेगळ्या व्यवसायात आपला जम बसवू पाहतात. अशीच अनेक मुले सरकारची कामे घेऊन आपला उदरनिर्वाह चालवण्याचा प्रयत्न करीत आहेत. यामध्ये सुद्धा सरकारी बाबूंपासून लोकप्रतिनिधीपर्यंत, ते अगदी काम का चांगले केले नाही म्हणून विचारणाऱ्या खंडणीबहादूरांसह अनेकांना ३० ते ४० टक्के रक्कम वाटण्यातच जात असते.

यामुळे इच्छा असूनही ते चांगले काम करू शकत नाहीत. सध्या काही काळासाठी लाडक्या बहिण योजनेचे पैसे स्थगित करून सर्व प्रकारच्या कंत्राटदारांची देणी सरकारने दिली पाहिजे. कारण रक्षाबंधनाच्या तोंडावर अन्य कोणी हर्षल व्हावा असे एकाही बहिणीला वाटणार नाही. अन्यथा हर्षल प्रमाणेच कोणावरही ही वेळ येण्याची वाट सरकारने पाहू नये.

कंत्राटदारांनीही हर्षल प्रमाणे टोकाचे पाऊल उचलू नये. जीवनात चढ-उतार येतच राहणार. रतन टाटांनी सांगितल्याप्रमाणे ईसीजीची रेषा जोपर्यंत खालीवर होत असते, तोपर्यंत तुम्ही जिवंत असता. रेषा सरळ झाली की सर्व काही संपलेले असते. या इसीजीच्या रेषेप्रमाणे जीवनात सुद्धा चढ-उतार येतच राहणार. याला तोंड द्यायला शिकले पाहिजे. कारण इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, परंतु त्यानंतर त्यांच्या माघारी एकाही अर्धांगिनीने आत्महत्या केलेली बातमी ऐकली नाही.

त्या जर समाजाशी दोन हात करून आपला प्रपंच चालवीत असतील, तर आपण देखील येणाऱ्या प्रसंगाला सामोरे जाऊन आपल्या कुटुंबासाठी असा अनाठायी विचार करूच नये. अशा लोकांना समाजानेही साथ देण्याची गरज आहे. कारण शेतकरी व असे कंत्राटदार लोक जात्यात आहेत बाकीचे सगळे सुपात आहेत एवढेच लक्षात ठेवावे. सरकारने देखील याची गांभीर्याने दखल घेतली पाहीजे.

विधानसभेत हाणामारी झाली, कोणी पक्ष चोरला तर कोणी बाप चोरला, भर रस्त्यावर दिवसाढवळ्या हनिमून साजरे केले जात आहेत, कोणी म्हणे 'विधानभवनेच्या बाहेर भेट, मंग मले सांग' असा दम तोंडात गुटख्याचा बार खाऊन दुसऱ्या लोकप्रतिनिधीला देतो, यापेक्षा महाराष्ट्राच्या दुर्दैव ते काय?




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६११४२०

## महाराष्ट्र प्रगतीकडे निघाला की दिवाळखोरीकडे?

महाराष्ट्र राज्याचे २०२५-२६ साठीचे एकूण अर्थसंकल्पीय बजेट सात लाख २० हजार कोटी रुपये प्रस्तावित आहे. एकूण महसूल उत्पन्न पाच लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये आहे. तर खर्च सहा लाख ६८५५ कोटी रुपये आहे. एकूण राजकोषीय तूट एक लाख ३६ हजार २३५ कोटी रुपयांची आहे. यामध्ये परवाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवण्या मागण्यांद्वारे ६४८६ कोटी रुपये तरतूद केली आहे. हे सर्व पाहिल्यानंतर राज्याची अर्थव्यवस्था किती डळमळीत झाली आहे हे लक्षात येते. राज्यावर एकूण नऊ लाख कोटी रुपये कर्ज दिसून येते. वरील सर्व तपशील देण्यामध्ये सर्वात महत्त्वाची अनाठायी केलेली तरतूद म्हणजे लाडकी बहीण योजना. मार्च २०२५ अखेर लाडक्या बहिणीं वरती ३३ हजार कोटी रुपये सरकारने खर्च केले आहेत. एकूण वार्षिक बजेट चाळीस हजार कोटींच्या आसपास केवळ लाडक्या बहिणींसाठी खर्च केले जाणार आहे. तोंडावर आलेले रक्षाबंधन या हर्षलच्या लाडक्या बहिणीला कसे वाटेल? राज्य सरकारकडून सार्वजनिक बांधकाम विभागात काम करणाऱ्या कांत्राटदारांचे सुमारे ४५ हजार कोटी रुपये येणे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत काम केलेल्या कंत्राटदारांचे बारा हजार कोटी रुपये येणे आहे. जलसंधारण व जलसंपदा मध्ये काम केलेल्या कंत्राटदारांचे १३ हजार कोटी रुपये, नगरविकास, ग्रामीण विकास, डिपीडिसी १८ हजार कोटी रुपये व इतर एक हजार कोटी रुपये मिळून एकूण जवळपास ८९ हजार कोटी रुपये सरकार राज्यातील वेगवेगळ्या कंत्राटदारांचे देणे आहे. हा आकडा एकूण अर्थसंकल्पाच्या बारा टक्के आहे. मग महाराष्ट्र प्रगतीकडे निघाला की दिवाळखोरीकडे?

## एकीकडे 'भारतरत्न' दुसरीकडे 'राजीनामा'?

राजकारणामधील एक नवीन प्रकार उदयास आला आहे. तत्पूर्वी थोडेसे मागे जावे लागेल. क्रिकेटचा देव म्हणून गौरविला गेलेल्या सचिन तेंडुलकरला सरकारने 'भारतरत्न' दिला. दुसऱ्या बाजूला तो रम्मीची जाहिरात करतो व ते सरकारला चालते. मंत्री माणिकराव कोकाटे विधीमंडळात रम्मी खेळत होते म्हणून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे. रम्मी खेळाला समर्थन नाही, परंतु रमी खेळले किंवा ते बघत होते, हा फार गंभीर गुन्हा नाही. सुप्रीम कोर्टाने रमी खेळावर बंदी घातलेली नाही. सरकारने आधी रम्मी खेळावर बंदी घालावी, मग कोकाटेंचा राजीनामा घ्यावा. दुसरे असे की, मंत्रीमंडळात अनेक मंत्र्यांवर आमदारांवर खुन, दरोडे, बलात्कार, जबरी गुन्हे, विनयभंग, भ्रष्टाचाराचे आरोप आहे, अशा सर्वांचेच राजीनामे घ्यावे, त्यांचे सदस्यत्व रद्द करावे, मग कोकाटेंचा राजीनामा घ्यावा. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा अजून सुटलेला नाही. यामध्ये माणिकराव कोकाटे अडसर ठरू नये, यासाठी देखील काहींना कोकाटेंना शह द्यायचा नसेल कशावरून? अशी शंका आहे. जिल्ह्यातीलच आमदार पालकमंत्री असावा अशी समस्त जिल्ह्यातील जनतेची भावना आहे. त्यात प्रभावी अडसर कोणाचाही असू नये, याची तर व्यवस्था झाली नसावी ना? आता तर अशी ही माहिती मिळाली आहे की, मंत्री कोकाटे यांच्या विरोधात आंदोलन करताना 'सर्व प्रकारची' रसद पुरविली जात आहेत. त्या माध्यमातून देखील आंदोलन सुरू आहे. अर्थात ऐकीव माहितीच्या आधारावर प्रामाणिकपणे आंदोलन करणारे देखील असतातच. मात्र राज्यात एक मोठा वर्ग असा आहे की, माणिकराव कोकाटे यांच्यासारखा काम करणारा नेता मंत्रिमंडळातून जायला नको आहे.

## पुन्हा शाळेत जावंसं वाटतंय...

आज मला पुन्हा शाळेत जावंसं वाटतंय,
माझ्या बेंच आणि वर्गाला भेटावंसं वाटतंय..

सांगावं त्याला तुज्याजवळ होते खूप सुखात,
शाळा सुटली नि खूप काही बदल झाला आयुष्यात..

चार आण्याच्या गोळीत सुद्धा तेव्हा किती गोडवा होता,
कॅडबरीलाही आज कडूपणा येत नाही घालवता..

घरच्या अभ्यासाचा तेव्हा ताण जरी थोडा यायचा,
जबाबदाऱ्या पेलताना आज लाभ होतो त्या अनुभवाचा..

शाळेच्या चार भिंतींत तेव्हा आनंद नव्हता मावत,
मोठ्या फ्लॅटलाही आता तेव्हढे सुख नाही देता येत..

गैरहजर राहता विचारणारे होते शिक्षक आणि मैत्रिणी,
असले काय नि नसले काय कुणाला फरक पडत नाही

म्हणून वाटतं दफ्तर घेऊन शाळेत पुन्हा जावं
बेन्चला, वर्गाला आणि शाळेला कडकडून भेटावं..

विद्यार्थ्यांच्या गर्दीतही शाळेने मला ओळखावं
तिच्याकडून पुन्हा एकदा जुन्या 'मी' ला भेटावं..

**ॲड. पूनम जाधव- हांडे, ठाणे.**

## श्रावण

श्रावणाची चाहूल झाली
आला सण उत्सव मेळा
माळरानात बांध्यावरती
रानभाज्यांचा मोठा वेढा

श्रावणाचे साजिरे रे रूप
बघता होई मन आनंदित
हिरवेगार गवताचे पाते
जणू बसले हिरव्या वर्दीत

तांबूस पिवळ्या किरणातून
ऊन पावसाचा चाले खेळ
क्षणात शांत कधी धो- धो
जसे पावसाला लागले वेड

रिमझिम रिमझिम छान वाटे
अवचित पडणारी सर
वृक्षवल्ली मनमोहक दिसती
इद्रधनुची असे त्यावर भर

थुई थुई करी मयूर रानात
गुलाब हसतो फांद्यावर
रानपाखरे मुक्त विहारी
दिसें रानफुलांना आलेला बहर

कधी दाटते मेघ अंबरी
कधी उन्हाची येई किरण
व्याकुळ मनास आंनदीत करी
श्रावणातील प्रत्येक सण

टपोरे शुभ्र दवबिंदू शोभे
पान, फुल, गवत, पातीवर
शेतकरांच्या कष्टाचे मोती
पीक डोलते काळ्या मातीवर

**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि अकोला.**
**9834583685**



# पालकांची संपत्ती ही त्यांची संस्कारी पिढी..!

जन्मापासून तर अगदी शेवटच्या क्षणापर्यंत आपलं संपूर्ण आयुष्य हे आपल्या मुलांच्या घडविण्यासाठी झोकून देणारी पालक खऱ्या अर्थाने कर्णाप्रमाणे सर्वस्व वाहून घेतात, आपला पाल्य आपल्यापेक्षा ही मोठा व्हावा हे फक्त पालकांची ईच्छा व अपेक्षा ही असते, ती पूर्ण करण ही प्रत्येक मुलांच्या मेहनत, संस्कार, पालकांच्या कष्टाची जाणीव यावर बहुदा यश निश्चित असते.

मुलांना नुसतच जन्म देऊन काही पालकांची मुक्ती होत नाही तर त्यांच्या संगोपण, व्यक्तिमत्त्व विकास, संस्कार, दर्जेदार शिक्षण यावर ही पालकांना मेहनत घेऊन एक उत्कृष्ट नागरिक बनवून आपली छबी ही त्या मुलाच्या जीवनात येईपर्यंत पालकत्व संपत नाही.

पालकांचे अनंत उपकार न फेडण्या सारखे आहेत त्यांच्या जीवनाचे सर्वस्व आपणास देतांना ते कुठेही कमी पडत नाही आपलं जीवन घडवतांना त्यांची मेहनत, काटकसर, नियोजन, सुखसुविधा, मार्गदर्शन,ही जीवनाची न संपणारी शिदोरी आपणास देतात, काबाडकष्ट करून आपलं जीवन उभे करणारी ही देवदूत.

पालकांना मात्र त्यांच्या मेहनतीचे फळ मुलांच्या प्रगतीत न दिसल्यास ते हताशही होतात कितीही पैसा, संपत्ती, कमावली तरी समाज पालकांच्या प्रगतीचा आलेख हा त्यांची मुले काय करतात यावर पालकांची प्रतिष्ठा अवलंबून असते.

कुणी काही घर, बंगले, शेती, बँक बॅलन्स पाहत नाही तर मुलांची स्वतःच्या पायावर उभी राहणारी क्षमता ही पालकांना मिळालेली सन्मान पूर्वक पावती आहे.

पूर्वी कुठंही चर्चा बैठकीत समाजातील मोठी मंडळी शेती मालमत्ता यांची चर्चा करायची आता मात्र मुलं काय करतात यावरून चर्चेची सुरवात होते तेव्हा आपल्या पालकांनी मान उंचीवर नेणे किंवा झुकवणे ही मुलांच्या प्रगतीवर अवलंबून आहे. मुलं चांगली निघणे हे पालकांच्या मेहनतीचे व मुलांच्या कष्टाचें घोतक आहे.

आजकाल पालकांची प्रतिष्ठा ही धुळीस मिळवण्यास मुलंही खूप कारणीभूत आहे घराची प्रतिष्ठा धुळीस मिळविण्यामुळे पालकांना समाजात शरमेने मान झुकते व आपल्या गैरव्यवहार, व्यसन, वादविवाद तंटे, पळून जाऊन लग्न करणे, यामुळे पालकांचे नाव बदनाम झाल्याने पालक हताश होतात.

म्हणून पालकांनी ही आपल्या मुलांवर कायम सकारात्मक विचार, संस्कार, परिस्थिती चे चटके, चांगले मित्र, यांवर विशेष लक्ष द्यावे जेणेकरून पिढी वाईट वृत्तीला बळी पडणार नाही.

**पालकांनी खालील बाबीवर नक्कीच मुलांना मार्गदर्शन करावे :**

घरच्या परिस्थिची जाणीव असावी.
मुलींना त्यांच्या भावना व्यक्त करायला शिकवा.
आई व वडील यांच्या पैकी एकाचा तरी धाक असावा.
आईने नक्कीच मुलीला चांगले वाईट यातला फरक सांगावा विशेषतः वाईट वृत्ती, स्पर्श.
घरात विसंवाद नसावा.
मुलींच्या सुख सुविधा वेळेप्रमाणे द्याव्यात.
रोज सामूहिक भोजन परिवाराने करावे.
मुलींना वयाप्रमाणे संस्कार, चालीरीती शिकवावे.
एक चांगली मैत्रीण ही भूमिका आईने बजावावी.

**राष्ट्रीय पालक दिवस**
**२७ जुलै**



उमेश ज्ञानेश्वर ईखे
कृष्ण विहार, नागपूर
9518571138
ikhe.soil@gmail.com

वडिलांनी न कळत सर्वत्र लक्ष द्यावे.
विघातक व्यविचारी वृत्ती पासून त्यांना दूर ठेवावे.
हौस मौज नक्कीच परिवारासोबत करावी.
व्यसनापासून दूर ठेवणे.
लैगिक साक्षर करणे.
मित्र मैत्रिणी चांगले असावे त्यांच्याशी संवाद साधावा.
मुलांना समजून घेताना भावनिक नाते निर्माण व्हावे.

आज हुशार असणारी अनेक पाल्य आहेत मात्र संस्कारित मोजकेच बघायला मिळतात चांगल्या विचारांची पेरणी करावी घरातील वातावरण आनंदी ठेवावे, आपला परिवार आदर्श राहावा मुलं मुली विचाराने आचरणाने, सक्षम होण्यासाठी आई वडील यांची भूमिका फार महत्त्वाचे आहे. एक वेळ संपत्ती कमी असली तरी चालेल मात्र संस्कारी पिढी घडविण्यासाठी पालकांनी काटकसर करू नये, योग्यवेळी केलेली मदत व सुखसुविधा ह्या पिढी घडविण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

एक पालक म्हणून आपली कर्तव्य आपण नक्कीच पार पाडतो मात्र पाल्यांवर अवास्तव विश्वास , अतिलाड, ही भविष्य बिघडविण्यासाठी पुरेस आहे, आज राष्ट्रीय पालक दिवस निमित्ताने सर्व पालकांचे मनस्वी अभिनंदन व त्यांचें उपकार कुठलाही पाल्य फेडू शकत नाही ही त्यांची संस्काराची शिदोरी कधी संपत ही नाही व सरतही नाही.

# इन्कमटॅक्स मध्ये धाड, सर्व्हे, सर्च आणि सीझर म्हणजे काय?

नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रूपात आपण इन्कमटॅक्सच्या सर्व्हे, सर्च आणि सिझर यासह नवीन माहिती बघणार आहोत.

**प्रश्न** - आपल्या राहत्या घरात इन्कमटॅक्स अधिकारी डायरेक्ट प्रवेश करू शकतात का?

■ आपले राहते घर म्हणजे राहणाऱ्या माणसांचा तो एक अभेद्य किल्ला असतो. त्याची आतील शांती बाहेरचे येऊन शांतीभंग करण्याचा कोणालाही अधिकार नाही. इन्कम टॅक्सवालेसुद्धा घरात येऊन विनाकारण शांतीभंग करू शकत नाहीत. इन्कम टॅक्सवाल्यांना सुद्धा सहसा घरात येण्याचे अधिकार नाहीत. घरातील माणसाची परवानगी घेऊनच त्यांना आत प्रवेश मिळवता येतो. परंतु, याला खालील अपवाद आहे.

**प्रश्न** - अपवाद म्हणून इन्कमटॅक्स अधिकारी यांना घरात डायरेक्ट प्रवेश कधी करता येतो?

■ ज्यावेळेस इन्कमटॅक्सवाल्यांना अशी शंका येते की, या करदात्याकडे बेहिशेबी मालमत्ता, सोने नाणं, जवाहरात, रोख रक्कम खूप आहे. अशा वेळेस इन्कमटॅक्स अधिकारी या व्यक्तीच्या अभेद्य किल्ल्यास भेदून घरात प्रवेश करू शकतात. इन्कमटॅक्सचे कलम १३२ यांना असा अधिकार प्रदान करतो.

**प्रश्न**- सर्व्हे, सर्च आणि सिझर म्हणजे काय?

■ सर्व्हेचा मराठी अर्थ सर्वेक्षण असा होतो. सर्च या शब्दाचा शोध आणि सिझर या शब्दाचा जप्ती असा होतो. यालाच सोप्या भाषेत असे म्हणता येईल, की चौकशी करणे किंवा छाननी करणे किंवा करदात्याकडे सर्वकाही त्याच्या पुस्तकाप्रमाणे व्यवस्थित आहे की नाही याला आपण सर्व्हे असे म्हणू या. सर्च यास आपण सहसा शोध असा अर्थबोध होतो.

म्हणजेच करदात्याकडे जे आहेत ते पुस्तकात नाही का, असे याचा शोध घेणे असा बोध होतो आणि सिझर म्हणजे अशा बेहिशेबी मालमत्ताची जप्ती करणे व ती कायदेशीर ताब्यात किंवा लॉकरमध्ये ठेवणे असा आहे. हे सर्व अधिकार इन्कमटॅक्स अधिकारी यांना कलम १३२ मध्ये प्रदान करण्यात आलेले आहेत. परिस्थिती पाहून त्यांना या कलमाचा अधिकार व उपयोग घेता येतो. सोप्या भाषेत यालाच आपण धाड असे म्हणतो.

**प्रश्न** - अनिवासी भारतीय यांच्यावर सर्च आणि सीझरची कारवाई करता येते का?

■ अनिवासी भारतीय म्हणजे इन्कमटॅक्स कायद्यात यालाच नॉन रेसिडेंट असे म्हणतात. सोप्या भाषेत याला असे म्हणता येईल की, अनिवासी भारतीय म्हणजेच असे व्यक्ती जे मूळतः भारतीय आहेत. परंतु, आता भारतात एकसारखे राहत नाहीत.

अनिवासी भारतीयसुद्धा तीन प्रकारात विभागले गेले असून, त्याची माहिती आपण पुढील लेखमालेत सविस्तर बघणार आहोत.

आता वरील प्रश्न असा आहे की, अशा अनिवासी भारतीय व्यक्तींवर इन्कमटॅक्सची कलम १३२ खालील धाड टाकता येईल की नाही. गुजरात हायकोर्टाने प्रभूभाई वसताभाई पटेल विरुद्ध आर.पी. मीना (२०००) ११२ टॅक्समन २७७ या केस मध्ये स्पष्ट सांगितले आहे की, भारताबाहेरून जर भारतात सोनं आणत असेल तर त्यांना सोनं कुठून आणले, हे दाखवणे जरुरी आहे, असे कोर्टाने सांगितले. इतकेच काय पण परमीटेड लिमिटमध्ये सोनं भारतात आणले असेल तरी त्याची माहिती देणे क्रम प्राप्त आहे, असेही हायकोर्टाने बजावले.

ज्या वाचकांना काही सूचना किंवा प्रश्न असतील त्यांनी आपल्या पूर्ण नावासह ९४२२२१८४२८ या नंबर वर फक्त व्हॉटस्ॲप मेसेज करावे, त्याची निशुल्क उत्तरे याच पेपरच्या पुढील लेखमालेत देण्यात येतील.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




# औषधापेक्षा कमी नाही मेथीचे पाणी



मेथी दाणे आपल्या भारतीय स्वयंपाक घरात सहज उपलब्ध होणारा पदार्थ आहे. हे मेथीचे दाणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत लाभदायी आहेत. कारण यामध्ये इतके लपलेले गुण आहेत की ते आपल्या आरोग्यासाठी वरदानापेक्षा कमी नाही. अनेक आरोग्य समस्या दूर करण्यासाठी देखील मेथीचे दाणे खूप उपयुक्त आहे. विशेषतः रात्रभर भिजवलेले मेथीचे पाणी.

मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवून त्याचे पाणी सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी प्यायल्याने अनेक आरोग्यदायी फायदे होतात. २१ दिवस सतत मेथीचे दाण्याचे पाणी प्यायल्यास बरेच फायदे मिळू शकतात.

**वजन कमी करण्यास उपयुक्त** : मेथीच्या बियांमध्ये सॉल्यूबल फायबर भरपूर प्रमाणात असते, जे पचन प्रक्रिया मंदावते आणि बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते. यामुळे अनहेल्दी नाश्ता खाण्याची इच्छा कमी होते आणि वजन नियंत्रित राहण्यास मदत होते . मेथीचे पाणी चयापचय वाढवते, ज्यामुळे फॅट बर्न होण्यास मदत होते.

**मधुमेह नियंत्रण** : मेथीच्या बियांमध्ये गॅलेक्टोमनन हे संयुग असते. जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते. तसेच इन्सुलिन संवेदनशीलता वाढवते आणि कार्बोहायड्रेट्सचे शोषण कमी करते. टाइप-२ मधुमेहाच्या रुग्णांना दररोज सकाळी मेथीचे पाणी पिण्याचा फायदा होऊ शकतो.

**पचनसंस्था मजबूत करते** : मेथीचे पाणी आम्लपित्त, बद्धकोष्ठता आणि गॅस सारख्या पचनाच्या समस्या दूर करण्यासाठी प्रभावी आहे. त्यात असलेले फायबर अन्नाचे पचन सुलभ करण्यास मदत करते आणि आतडे स्वच्छ करते.

**कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते** : मेथीच्या बियांमध्ये सॅपोनिन संयुगे असतात, जे कोलेस्टेरॉलचे शोषण कमी करतात. मेथीचे पाणी नियमितपणे प्यायल्याने खराब कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते आणि चांगले कोलेस्टेरॉल वाढते. यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### ॥ दिंडी सोहळा ॥

शेगावीच्या राणाची दिंडी
आली हो मेहकरले
पंचक्रोशीतीलभक्तगण
दर्शना आतुर झाले ...

गणगणात बोते म्हणता
प्रपंचाचा शिण हरते
दर्शन होता गजाननाचे
मनी चैतन्य संचारते ...

मका सेवनाच्या प्रसंगी
भक्तांना दृष्टांत हा दिला
संकटी नाती गोती नव्हे
फक्त ईश्वरच येई कामाला ..

## नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २६ जुलै :** येथील जवाहरनगर वार्डातील रस्त्याच्या दोन्ही बाजूला नालीचे बांधकाम सुरू असून चक्क पाण्याचा प्रवाह सुरू असताना वाहत्या पाण्यात नालीचे बांधकाम करण्यात येत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.या नियोजनशुन्य कामामुळे नालीच्या दर्जावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. नगर परिषद अंतर्गत आमराई व जवाहर नगर वॉर्डात जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला काँक्रिट नालीचे बांधकाम सुरू आहे.या नालीचे अंदाजपत्रक अंदाजे १५ लाखाच्या आसपास असल्याचे बोलले जात आहे.मात्र कामात सुसुत्रता नसल्याचा प्रकार समोर आला.

## गरीब दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मदत

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २६ जुलै :** मुल तालुक्यातील सोमनाथ प्रकल्पातील महारोगी सेवा समिती वरोरा तर्फे विना अनुदानित वसतिगृह चालवले जाते, जिथे अत्यंत गरीब आणि दुर्गम भागातील मुली शिक्षणासाठी वास्तव्यास आहेत. या मुलींना वह्या, पुस्तके, छत्री आणि टिफीन बॉक्स यांसारख्या अत्यावश्यक शैक्षणिक साहित्याचा तुटवडा जाणवत होता. या परिस्थितीची माहिती मिळाल्यानंतर समितीचे स्वयंसेवक अरुण कदम यांनी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांना केवळ एक फोन केला. या एका फोनवर क्षणाचाही विलंब न करता आ. मुनगंटीवार यांनी विद्यार्थिनींना लागणारे साहित्य तातडीने पुरवण्याचा निर्णय घेतला.

# तहसीलदार साहेब जरा लक्ष द्या!

### बंधाऱ्यामुळे दरवर्षी नाल्याचा पूर; नाईकनगर पुन्हा पाण्यात !

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २६ जुलै :** दिनांक २३ जुलै २०२५ रोजी नाईकनगर गावात नाल्याचा पूर आला आणि पुन्हा एकदा गावकऱ्यांच्या घरात पुराचे पाणी घुसून नुकसान झाले.पावसाळा सुरू झाला की नाईकनगरसाठी हा पुराचा धोका आता नेहमीच्याच भीषण वास्तवात बदलला आहे.



गावापासून अवघ्या ५० मीटर अंतरावर बांधलेला बंधारा ही या आपत्तीचं मूळ कारण ठरत आहे. नाल्यातील कचरा आणि पाणी बंधाऱ्यावर अडतं आणि उलट गावात घुसतं.दरवर्षी गावकऱ्यांचं लाखो रुपयांचं नुकसान होतं. घरातलं अन्न, कपडे, भांडी, सर्व काही वारंवार पाण्यात वाहून जातं, आजारीपणाचं सावट वाढतं आणि लोकांचे संसार उद्ध्वस्त होतात.

गावकऱ्यांनी याबाबत अनेकदा तक्रारी केल्या, निवेदनं दिली, पण प्रशासनाने आजवर कायमस्वरूपी उपाययोजना केलेल्या नाहीत.

**गावकऱ्यांची मागणी**

हा बंधारा तातडीने पाडून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह मोकळा करावा.नुकसानभरपाई नको, कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.पूरग्रस्तांसाठी पक्क्या घरकुलांची तातडीने मंजुरी द्यावी.

दरवर्षी होणाऱ्या या पुरामुळे नाईकनगर गावकरी आता संतापलेले आणि हताश झाले आहेत .लवकरात लवकर तहसीलदार साहेबानी निर्णय घ्यावा अशी मागणी बंजारा टायगर युवा संघटना चे प्रमोद राठोड,शिवकुमार आडे,श्रीकांत आडे,लखन चव्हाण,अभिषेक राठोड,आकाश आदे,कृष्णा जाधव,अनीश राठोड,भूषण राठोड,आशुतोष जाधव,पंकज राठोड,संदीप पवार,प्रफुल्ल जाधव,कुणाल शेंडे,उमेश चव्हाण,आदित्य चौधरी व इतर गावकऱ्यांनी केली आहे.

# ३५५ कार्यक्रमांचे नियोजन कौतुकास्पद - बांधकाम मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले

### देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहानिमित्त आयोजित पक्षप्रवेश व कार्यकर्ता मेळावा संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि. २६ जुलै :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी सुरू केलेली जनसेवेची ही ३५५ कार्यक्रमाची मालिका कौतुकास्पद आहे. या उपक्रमांचा थेट लाभ जनतेपर्यंत पोहोचत आहे. मि आमदार असता पासून किशोर जोरगेवार हे आमचे मित्र असून ही मैत्री आज अधिक दृढ झाली आहे. कामाचा सातत्याने पाठपुरावा करून त्यांना मार्गी लावणारा आमदार म्हणून त्यांची ओळख आहे. आज त्यांचे सामाजिक भान आणि नियोजनही पाहता आले असून सेवाभावी कार्यक्रमांनी चंद्रपूरचा सेवा सप्ताह सजला असल्याचे प्रतिपादन राज्याचे बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.



आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून आयोजित देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहानिमित्त बालाजी सभागृहात कार्यकर्ता मेळावा, रक्तदान शिबिर, मंडळ अध्यक्षांना संगणक वाटप. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नवनियुक्त पदाधिकारी आणि संचालकांचा सत्कार, आणि पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मंत्री भोसले बोलत होते.

या कार्यक्रमाला आमदार किशोर जोरगेवार, महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टुवार, भाजप नेते अशोक जिवतोडे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, उपाध्यक्ष संजय डोंगरे, प्रकाश देवतळे, रघुवीर आहिर, दशरथसिंह ठाकूर, नामदेव डाहुले आदींची उपस्थिती होती.

पक्षाचे काम अधिक गतिशील करण्याच्या हेतूने आमदार किशोर जोरगेवार यांच्या वातीने नवनियुक्त पाच मंडळ अध्यक्षांना मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते संगणक व प्रिंटरचे वाटप करण्यात आले. त्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील नवनियुक्त पदाधिकारी आणि संचालकांचा सत्कारही मंत्री भोसले यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना मंत्री भोसले म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देशातील सर्वमान्य नेतृत्व आहे. पक्ष संकटात असतानाही राज्यासह इतर राज्यातील निवडणुकांमध्ये त्यांनी नियोजनबद्ध काम करत सत्ता मिळवून दिली आहे. राज्यातील प्रत्येक घटकांचे प्रश्न समजून घेणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्य प्रगतीपथावर आहे.

# राजुरा नगर परिषदेच्या वाढीव गृहकर प्रकरणी आमदार देवराव भोंगळे यांचा नागरिकांना दिलासा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २६ जुलै :-** राजुरा नगरपरिषदेने नागरिकांना वाढीव मालमत्ता कराच्या नोटीस दिल्या असून काही नागरिकांच्या करामध्ये तब्बल चौपट वाढ करण्यात आली आहे.



राजुरा शहरांत नऊ हजारहून अधिक मालमत्ता असून तब्बल पाच हजारहून अधिक नागरिकांनी ह्या वाढीव माळामत्ता करावर हरकत नोंदवली होती, नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता आमदार देवराव भोंगळे यांनी नागरिकांसमवेत मुख्याधिकारी ह्यांची भेट घेतली व ह्याबाबत तथ्यता जाणून घेतली, मुख्यधिकारी ह्यांनी सांगितले की राजुरा शहरात वर्ष २०१४ पासून मालमत्ता करात वाढ केलेली नाही, मागील दहा वर्षाच्या काळात अनेक नागरिकांनी कच्च्या घराच्या जागेवर पक्क्या घराचे बांधकामकेलेले आहे, अनेक नागरिकांनी बांधकामं क्षेत्रात वाढ केलेली आहे, शहरात २१०० हुन अधिक रिकामे प्लॉट होते तेव्हा त्या नागरिकांना रिकाम्या प्लॉट चे कर लागू होते परंतु आता त्यावर बांधकाम झाल्याने ह्या घराच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे करात वाढ करण्यात आली आहे, अनेक नागरिकांच्या मालमत्तेवर अत्यंत कमी मालमत्ता कर लावण्यात आला होता,काही नागरिकांनी घरगुती बांधकामाची परवांगी घेउन व्यवसायिक बांधकाम केलेले आहे ह्या मालमत्तेचा सर्व्हे करून व मोजमाप करून त्यावर वाढीव कर आकरण्यात आला आहे, त्यामुळे ह्या सर्व मालमत्तेवर कर वाढवला नसून मालमत्तेचे प्रत्यक्ष मोजमाप करून कर आकारनी करण्यात आल्यामुळे त्यांनी ह्या मालमत्तेवर केलेल्या कर आकारणीचे समर्थन केले, आमदार भोंगळे ह्यांनी देखील ह्या मालमत्तेवर आकरण्यात आलेल्या समर्थन करताना ज्या मालमत्तामध्ये कुठल्याही प्रकारचे बदल झालेले नाही, नवीन बांधकाम झालेले नाही, बांधकाम क्षेत्रात वाढ़ झालेले नाही अश्या नागरिकांच्या मालमत्तेवर वीस टक्क्याहून अधिकची कारवाढ़ करू नये असे निर्देश नप मुख्याधिकारी ह्यांना दिले,शहरातील अतिक्रमणबाबत त्यांनी कुठलेही नवीन अतिक्रमण न होऊ देण्याबाबत सतर्क राहण्याच्या सूचना मुख्यधिकारी ह्यांना दिल्या, बैठकीला मुख्याधिकारी धुमाळ, भाजपचे शहर अध्यक्ष सुरेश रागीट, म, मिलिंद देशकर बंडू वनकर, मंगेश श्रीराम, सागर भटपल्लीवार श्रीकृष्ण गोरे,ह्यांच्या सह शहरातील नागरिक मोठया प्रमाणात उपास्थित होते,

## मनपा शाळेत सिसिटिव्ही सुविधा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २६ जुलै :** चंद्रपूर महानगरपालिका शाळांमधील बालसुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिकेने आता शाळांना सीसीटीव्हीचे सुरक्षा कवच दिले असुन २४ शाळांमध्ये एकुण २५६ सीसीटीव्ही कॅमेरे विद्युत विभागामार्फत बसविण्यात आले आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेच्या एकुण २६ शाळा आहेत. या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आयुक्त व प्रशासक विपीन पालीवाल यांनी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे निर्माण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता महापालिकांच्या २६ पैकी २४ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षित आणि शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने बसविले गेले .

# ३० जुलै रोजी राजुरा, घुग्घूस व पोंभुर्णा येथे मोफत महाआरोग्य शिबीर

### नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आ. भोंगळे यांचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २६ जुलै :** आमदार तसेच घुग्घुसचे भुमीपुत्र देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याचे माजी मंत्री, आमदार सुधीरमुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ३० जुलै रोजी जिल्ह्यात राजुरा, घुग्घूस व पोंभुर्णा येथे भव्य महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

या शिबिरामध्ये जवळपास सर्वच प्रकारच्या आजारांचे निदान, उपचार व शस्त्रक्रिया मोफतपणे करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

सदर शिबीर राजुरा येथे महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात तर घुग्घूस येथे प्रयास सभागृहात आणि पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालय परिसरात संपन्न होणार असून सकाळी ०९ वाजेपासून सुरू होणार आहेत.

याठिकाणी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय चंद्रपूर, जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूर, आचार्य विनोबा भावे ग्रामिण रुग्णालय सावंगी मेघे, एन.सी.आय. कॅन्सर हॉस्पिटल नागपूर, शालिनीताई मेघे हॉस्पिटल वानाडोंगरी, नागपूर, ग्रामीण रुग्णालय राजुरा, घुग्घूस व पोंभुर्णा येथील मेडिसीन, नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रिरोग, कान-नाक-घसा, अस्तिरोग, त्वचारोग आणि कॅन्सर यांसारख्या रोगांवरील तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार असून याठिकाणी सर्व चाचण्या व मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करून देण्यात येणार आहे. त्यासाठी राजुरा व पोंभुर्णा तालुक्यातील नागरिकांसह घुग्घूस शहर परिसरातील नागरिकांनी सदर शिबीरांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक तथा आमदार देवराव भोंगळे यांनी केले आहे.

# आ. भांगडीया यांना मंत्रीमंडळात स्थान मिळण्याची शक्यता

### चिमूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांची अपेक्षा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २६ जुलै :** चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी नुकतेच जिल्हा सहकारी बँक भाजपा ला मिळवण्यासाठी अहोरात्र एक करून वरिष्ठांना आपल्या कार्याची ओळख दाखवून दिली त्याचे बक्षिस म्हणून आमदार किर्तिकुमार भांगडीया यांना मंत्रीमंडळात स्थान मिळण्याची शक्यता असल्याची राजकीय जानकारी वर्गात जोरदार चर्चा सुरू आहे आणि चिमूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांची अपेक्षा सुध्दा आहे.

यापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात चिमूर विधानसभा क्षेत्रातील माजी मंत्री डॉ. रमेशकुमार गजबे, त्यानंतर राज्य मंत्र्याचा दर्जा असलेले खनिकर्म महामंडळाचे अध्यक्ष म्हणून माजी आमदार डॉ अविनाश वारजुकर, माजी मंत्री



आमदार विजय वडेट्टीवार यांना मंत्रीमंडळात स्थान मिळालेले होते.

२०१४ पासुन सलग तिन वेळा निवडणूक जिंकून चिमूर विधानसभा क्षेत्राचे पतिनिधित्व करित असलेले आमदार किर्तिकुमार भांगडीया हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अगदी जवळचे विस्वासु समजले जातात तसेच दोन वर्षापुर्वी राज्यात सत्ता परिवर्तन करतांना आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी मोलाचे सहकार्य केलेले होते. एवढेच नव्हे तर २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकिमध्ये सुद्धा पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा विस्वास संपादन केलेला आहे. आणि नुकत्याच झालेल्या जिल्हा सहकारी बॅंकेच्या निवडणुकीत अहोरात्र मेहनत घेऊन पहील्यांदाच भाजपा समर्थीत संचालकांना एकत्र करून एकहाती सत्ता स्थापन केलेली आहे. यामुळे आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी पक्षातील वरिष्ठ नेत्यांचा विस्वास संपादन केलेला आहे. आणि चिमूर विधानसभा क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, भाजपा ला बळकट करून आगामी स्थानिक निवडणुकीत एकहाती सत्ता पाप्त व्हावी म्हणून मंत्रीमंडळात महत्वाचे स्थान मिळण्याची शक्यता असल्याची खंमग चर्चा परिसरातील राजकीय जानकारी वर्गात मोठ्या पमाणात सुरू आहे. आणि चिमूर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांची अपेक्षा सुद्धा आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय चंद्रपूर यांना पाच व्हीलचेअर उपलब्ध

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २६ जुलै :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय चंद्रपूरला दिव्यांग कौशल्य विकास मल्टीपर्पज सोसायटी चंद्रपूरकडून पाच व्हील चेअर देणगी रूपात नुकतेच प्राप्त झाले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ मिलिंद कांबळे, क्षयरोग विभागाचे विभागप्रमुख डॉ भडके, वैद्यकीय महाविद्यालयाचे उपवैद्यकीय अधीक्षक डॉ अमित प्रेमचंद, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ भास्कर सोनारकर, शरीररचनाशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ कुलेश चांदेकर तसेच दिव्यांग कौशल्य विकास मल्टीपर्पज सोसायटी चे अध्यक्ष श्री निलेश पाझारे मंचावर उपस्थित होते. या सर्वांचे उपस्थितीत वॉर्ड परिसेविका यांचेकडे व्हीलचेअर सुपूर्द केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना समाजसेवा अधीक्षक राकेश शेंडे यांनी निलेश पाझारे यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देऊन त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व दिव्यांग बांधवांसाठी करत असलेल्या कार्याची ओळख करून देऊन रुग्णालयात व्हीलचेअर चे असलेले महत्त्व विशद केले. याप्रसंगी उपस्थित असलेले अधिष्ठाता डॉ मिलिंद कांबळे यांनी



आपल्या मनोगतनातून रुग्ण हित समोर ठेवून पाच व्हीलचेअर देणगी रूपात दिल्याबद्दल दिव्यांग कौशल्य विकास मल्टीपर्पज सोसायटी चे अध्यक्ष निलेश पाझारे यांचे आभार मानले. व या व्हीलचेअर आरोग्य सेवा देताना खूपच महत्त्वाच्या असल्याचे बोलले. याप्रसंगी निलेश पाझारे यांनी रुग्णालयातील व्हीलचेअर ची गरज ओळखून व्हीलचेअर देणगी स्वरूपात देत असल्यामुळे आनंद होत असून यापुढेही आपण छोट्या मोठ्या रुग्ण उपयोगी वस्तू देणगी म्हणून देत राहू असे आश्वस्त केले.

देणगी स्वरूपात व्हील चेअर मिळण्याकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ मिलिंद कांबळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ निवृत्ती जीवने यांचे मार्गदर्शनाखाली समाजसेवा अधीक्षक श्री राकेश शेंडे यांनी श्री निलेश पाझारे यांच्याशी संपर्क साधून देणगी स्वरूपात पाच व्हीलचेअर प्राप्त करून देण्यात आल्या. शहरातील दानशूर संस्था व दानशूर व्यक्ती यांनी रुग्ण हित समोर ठेवून सामाजिक उत्तरदायित्वासाठी पुढे यावे असे आवाहन याप्रसंगी मान्यवराकडून तसेच समाजसेवा विभागाकडून करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाजसेवा अधीक्षक तानाजी शिंदे, तर मान्यवरांचे आभार समाजसेवा अधीक्षक उमेश आडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजसेवा अधीक्षक सर्व श्री भास्कर झळके, राकेश शेंडे, उमेश आडे, हेमंत भोयर, भूषण बारापात्रे, तानाजी शिंदे, मिलिंद बहादे, नागेश मेश्राम, सचिन सहारे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला बहुसंख्येने अधीपरिचारिका, परिसेविका उपस्थित होते.

# महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या उपाध्यक्षांची मोरवा विमानतळास भेट

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २६ जुलै :** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड (MADC) च्या उपाध्यक्षा तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी नुकतीच चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाला भेट दिली. नागपूर फ्लाइंग क्लबने आपला फ्लाइंग सेक्शन प्रशिक्षणासाठी अलीकडेच या ठिकाणी स्थलांतरित केल्याने सदर भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

मोरवा विमानतळ हे MADC च्या मालकीचे असून, नागपूर फ्लाइंग क्लबला विमान उड्डाण प्रशिक्षणासाठी सुपूर्त करण्यात आले आहे. सौ. पांडे यांचा दौरा या प्रशिक्षण केंद्रातील उपलब्ध



पायाभूत सुविधा, तांत्रिक गरजा व भविष्यातील विकास संधींचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सौ. पांडे यांनी प्रशिक्षणार्थी कॅडेट्सशी संवाद साधत प्रत्यक्ष प्रशिक्षण अनुभव जाणून घेतला आणि त्यांच्या अडचणी व अपेक्षांचा देखील आढावा घेतला. तसेच नागपूर फ्लाइंग क्लबचे व्यवस्थापकीय संचालक तेजू सिंग पवार यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून सध्या सुरू असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची माहिती व भविष्यातील योजना जाणून घेतल्या.

# चंद्रपूर मनपातर्फे एक विद्यार्थी एक झाड स्पर्धा

### मनपा क्षेत्रातील सर्व शाळांचा असणार सहभाग, विद्यार्थी लावणार 'एक पेड मां के नाम'

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २६ जुलै :** सध्याच्या काळातील वाढते वातावरणीय बदल, तीव्र उन्हाळा व अतिवृष्टी यामुळे निर्माण झालेले असमतोल आणि वृक्षांची घटती संख्या ही एक गंभीर समस्या बनली आहे. यावर उपाय म्हणून वृक्ष लागवड ही प्रत्येकाची जबाबदारी असून, हे राष्ट्रीय कर्तव्य मानून चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे लवकरच घेण्यात येणाऱ्या 'एक विद्यार्थी, एक झाड' स्पर्धेत सर्व शाळांनी भाग घेण्याचे आवाहन आयुक्त विपीन पालीवाल यांनी केले.



मनपा क्षेत्रातील शासकीय व खाजगी सर्व शाळांसाठी वृक्ष लागवडीबाबत बैठक मनपा सभागृहात आयोजीत करण्यात आली होती, या प्रसंगी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की,घटत चाललेल्या हरित क्षेत्राची भरपाई करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. 'एक विद्यार्थी, एक झाड' स्पर्धा हा त्याच दिशेने टाकलेले एक सकारात्मक पाऊल असुन स्पर्धेमध्ये शाळांनी सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून वृक्षारोपणास चालना द्यावी.

हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र या अभियांनातर्गत वर्ष २०२५ करिता १० कोटी वृक्ष लागवड मोहिम अंतर्गत वृक्षारोपण मोहिम राबविण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. वृक्ष लागवडीसाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने ५० हजार झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. एक विद्यार्थी, एक झाड स्पर्धा व एक पेड माँ के नाम या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करणे. लहान वयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार रुजवणे ही भूमिका आहे.

शहराचे ग्रीन झोन वाढविण्यास घेण्यात येणाऱ्या एक पौधा एक विद्यार्थी स्पर्धेअंतर्गत विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करणे,वृक्षाचे संवर्धन व पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार असुन स्पर्धेसाठी लागणारी आवश्यक ती झाडे मनपातर्फे पुरविण्यात येणार आहे. सहभागी शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड दिले जाणार असुन त्या झाडाचे संगोपन व संवर्धन त्या विद्यार्थ्याला करावयाचे आहे. वृक्षाचे संगोपन कसे सुरु आहे याची माहिती संबंधित शिक्षकांद्वारे घेतली जाणार असुन झाडाचे संगोपन करून वाढविल्याबद्दल प्रमाणपत्र,ट्रॉफीसोबतच अतिरिक्त २० गुणसुद्धा शाळेतर्फे दिले जाणार आहे.

याप्रसंगी शिक्षणाधिकारी माध्यमिक राजेश पातळे,विस्तार अधिकारी मनोज गौरकार,उपअभियंता रवींद्र कळंबे, चैतन्य चोरे,मनपा शिक्षणाधिकारी नागेश नीत,स्वयंसेवी संस्था, मोठ्या संख्येने शाळांचे मुख्याध्यापक तसेच मनपा अधिकारी कर्मचारी उपस्थीत होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

## प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी...

**विजेच्या दिव्यांच्या लखलखाटातही दिव्याच्या अमावस्येचं महत्त्व कायम आहे. घरातील सर्व दिवे घासूनपुसून साफ करायचे, प्रज्वलित करायचे, त्यांना कापसाची वस्त्रं घालायची, हारफुलांनी शृंगारायचं आणि त्याच्यापासून मिळणाऱ्या तेजाने उजळून निघालेल्या मनाने उत्सवपर्वाच्या स्वागताची सिद्धता करायची असा या निमित्ताने पार पडणारा सुंदर उपचार आहे. यामुळे घराचेच नव्हे तर मनाचे अंधारलेले कोपरेही प्रकाशमान व्हायला हवे.**

भक्ती विशेष

आता पाऊस स्थिरावला आहे. मैफिलीच्या सुरूवातीला वाद्यवृंदाशी जुळवून घेण्याची, रसिकांच्या आवडीचा वेध घेण्याची, आवाज लावण्याची गायकाची तयारी पूर्ण होते आणि मैफिलीवर कब्जा मिळवणारे, रसिकांच्या मनावर हुकूमत गाजवणारे गायकाचे सूर घुमू लागतात तसं काहीसं होतं आषाढात... आता मल्हाराच्या सुरांनी वातावरणातलं एक प्रकारचं भारलेपण दाटलेलं असतं. सरींना एक सुंदर लय सापडली आहे. संततधार पावसामुळे सगळीकडे नवचैतन्य पसरलं आहे. अशा या भारलेल्या वातावरणात वेध लागतात ते श्रावणातल्या उत्सवांचे. श्रावणमास म्हणजे उत्सवपर्वाची सुरूवात. याची तयारी करायलाच हवी. याची सुरूवात होते दिव्याच्या अमावस्येपासून. आषाढी अमावस्येला दिव्यांची पूजा होते आणि अंध:कार दूर लोटत प्रकाशाचं साम्राज्य सर्वदूर पसरतं.

आषाढी अमावस्या हा आनंद आणि उत्साहाने साजरा करावा असा दिवस. या दिवशी घरातील सगळे दीप घासूनपुसून स्वच्छ केले जातात. आता विजेचे दिवे वापरात असल्यामुळे अंधार पसरल्यावर उजेड मिळवण्यासाठी तेला-तुपावर तेवणारे दिवे प्रज्वलित करण्याची गरज राहिलेली नाही. आता तिन्ही सांज झाली की फक्त देवापाशी तेलाचा दिवा तेवतो, अन्यत्र नाही. पण हा बदल झाला असला तरी दिव्याच्या अमावस्येच्या निमित्ताने घरातील सगळे दिवे बाहेर काढले जातात. आपल्याकडे दिव्यांचे असंख्य प्रकार पहायला मिळतात. प्रत्येकाचा आकार वेगळा, उपयोग वेगळा. देवाला ओवाळण्यासाठी निरांजन, देवापुढे लावण्यासाठी समई, आरतीसाठी पंचारती, कोपऱ्यात लामणदिवा, घरातलं अंधाराचं साम्राज्य हटवण्यासाठी कंदील अथवा बत्ते यासारखे एक ना अनेक प्रकार घरात असतात. या दिवशी हे सर्व दिवे लखलखीत करायचे, रांगोळीचा चौक घालून सजवायचे, हारफुलांनी शृंगारायचे, कापसाच्या वस्त्रांनी झाकायचे, या दीपतेजाला नैवेद्य दाखवायचा आणि वंदन करुन प्रकाशाचं दान मागायचं इतका मंगलमय हा उपचार... अनेक घरांमध्ये आजही मनोभावे दिव्यांची पूजा केली जाते.

या पूजेमागे तेजाची, प्रकाशाची पूजा करण्याचं औचित्य आहेच, त्याचबरोबर येणाऱ्या उत्सवपर्वाच्या स्वागताची तयारीही आहे. आता दिवाळीपर्यंत सणावारांची रेलचेल सुरू राहणार आहे. श्रावणात साजरे होणारे प्रत्येक सण, त्यानंतर येणारे गौरी-गणपती, नवरात्र, दसरा आणि दिवाळी असा मोठा कालखंड धामधूमीत सरणार असतो. या सणांनिमित्त घरात सजावट केली जाते. सजावट प्रकाशमान करण्यासाठी दिव्यांची आरास आवश्यक असते. कदाचित याचीच सिद्धता करण्यासाठी घरातील सर्व दिवे घासूनपुसून लखलखीत करण्याची ही शिस्त अंगिकारली गेली असावी.

या दिवशी अन्य काही रुढीही पाळल्या जातात. काही घरांमध्ये विस्तवावर तवा ठेवला जात नाही. या दिवशीचा खास मेन्यु म्हणजे कणकेचे अथवा बाजरीचे दिवे. बाजरीची भरड शिजवून त्याचे दिवे करायचे आणि दूध-गुळाबरोबर कुस्करुन खायचे. दुसरा एक प्रकार म्हणजे गुळाच्या पाण्यात कणीक भिजवायची आणि त्याला दिव्यांचा आकार देऊन वाफलवून घ्यायचं. गोडसर चवीचे कणकेचे हे दिवेही छान लागतात. दिव्यावर मनसोक्त तूप घेऊन खाणं हा आजही अनेकांचा आवडता प्रकार असेल. तर असा हा दिव्यांचा



सण... आपल्या संस्कृतीमधील सजिवांप्रमाणेच निर्जीवांचा सत्कार, सन्मान करण्याचे संस्कार या मंगल सणामध्ये दिसून येतात.

आपल्याकडे दररोज रात्री परवचा म्हणण्याची पद्धत आहे. कालानुरुप काही घरांनी या सुंदर प्रथेचा त्याग केला असला तरी आजही अनेक घरांमध्ये देवापाशी दिवा लावल्यावर शुभंकरोती म्हटली जाते. ही त्या तेजाची आराधना असते. अंधारावर विजय मिळवण्याची क्षमता देणाऱ्या प्रकाशाला केलेलं ते अभिवादन असतं. अंध:कार म्हणजे तेजरहित अवस्था... मग हे तेज बुद्धीचं असेल, ज्ञान-विज्ञानाचं असेल, धीरोदात्ततेचं असेल, कलागुणांचं असेल, निखळ आणि प्रांजळ स्वभावाचं असेल, मनातील भूतदयेचं असेल... तेजाचे असे कोपरे असलेलं व्यक्तिमत्त्व कायमच झळाळत असतं. ते स्वत: प्रकाशाचा दीपस्तंभ असतंच पण या तेजाने उजळलेल्या वाटांवर चालणाऱ्या अनेक पांथस्तांसाठीही त्याचं महत्त्व अपूर्व आणि अनमोल असतं. म्हणूनच दीप उजळणं, अंधार दूर सारणं या कृत्यातून मनातील अंधारलेले कोपरे उजळून टाकण्याचाही संकेत दिला जातो. दररोज दिव्यासमोर हात जोडून आपण हेच वरदान, हेच शहाणपण मागत असतो. दिव्याच्या अमावस्येच्या निमित्ताने पुन्हा एकदा हीच प्रार्थना केली जाते. मनात दु:ख, व्यथा, चिंतेची काजळी असताना उत्सव साजरा करणं हे केवळ उपचार ठरतील. पण हे केवळ उपचार न राहता आनंदनिधान ठरावं, व्रतवैकल्यांद्वारे मिळणारी ऊर्जा, चैतन्य थेट पाझरावं या हेतूने मनाची कवाडं उघडण्यासाठी दाखवलेली मशाल म्हणूनही आपण या साजरीकरणाकडे पाहू शकतो. आपल्या सणांमध्ये, प्रथा-परंपरांमध्ये असे अनेक संकेत दडले आहेत. गरज आहे त्याकडे सुबुद्ध नजरेने बघण्याची...

आज सगळा परिसर विजेच्या दिव्यांनी तेजाळत असला तरी समईच्या मंद प्रकाशाची महती तसुभरही कमी झालेली नाही. किंबहुना, मेडिटेशनमध्ये या मंद तेवणाऱ्या ज्योतीकडे एकटक बघण्याचा उपाय अस्थिर मनाला ताळ्यावर आणण्याचा सुकर मार्ग असल्याचं सांगितलं आहे. समईभोवतीचं तेजोवलय आपल्याला एका अवकाशाची प्राप्ती करुन देतं. या अवकाशात स्वत:च्या अस्तित्वाचं प्रयोजन आणि जागृतीचा अर्थ गवसतो. आरतीच्या ताम्हणातल्या इवल्याशा निरांजनाची धग साशंक मनातली आंदोलनं शांत करण्यास पुरेशी असते. तो कर्पुरमिश्रीत सुगंध घराच्या कानाकोपऱ्यातील नकारात्मक ऊर्जा दूर घालवून देतो. म्हणूनच वातीच्या अग्रावर डोलणाऱ्या लवलवत्या ज्योतीची महती आपल्याला जाणवते. आपणही तिला वंदन करु या आणि येऊ घातलेल्या प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी सज्ज होऊ या.

## यशस्वी होण्यासाठी...

भक्ती आणि बोध

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपण बरेच प्रयत्न करतो. पण अहंकारावर मात करता आली तर आपण सहज यशस्वी होऊ शकतो. एका बोधकथेतून याबाबत जाणून घेऊ. स्वामी सदानंद हे स्वामी श्रद्धानंद यांचे शिष्य होते. गुरूकुलात राहून सदानंदांनी शिक्षण पूर्ण केलं. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते अहंकारी बनले. इतरांना कमी लेखू लागले. यामुळे मित्रपरिवार त्यांच्यापासून दूर होऊ लागला. याबाबत स्वामी श्रद्धानंदांना कळलं पण शिष्य गंमत करत असतील असं वाटून त्यांनी दुर्लक्ष केलं. पण श्रद्धानंदांनाही याचा अनुभव आला. एके दिवशी श्रद्धानंद सदानंदांच्या जवळून गेले. त्यावेळी सदानंदांनी आपल्या गुरूकडे अजिबात लक्ष दिलं नाही. त्यांना वंदनही केलं नाही. यामुळे



श्रद्धानंदांना खरं काय ते कळलं. सदानंदांना अहंकाराने ग्रासलं असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. सदानंदांचा अहंकार मोडायला हवा. अहंकारी वृत्तीमुळे भविष्यात त्यांचं काहीही भलं होणार नाही, हे त्यांनी जाणलं होतं. आता यासाठी नेमकं काय करायला हवं, असा विचार श्रद्धानंदांनी करायला सुरूवात केली. श्रद्धानंदांनी सदानंदाला आपल्यासोबत फिरायला येण्याबाबत विचारलं. दुसऱ्या दिवशी दोघेजण रानात फिरायला गेले. त्यावेळी समोरून एक झरा वाहत होता. श्रद्धानंदांनी सदानंदांना विचारलं, तुला समोर काय दिसत आहे? सदांनद म्हणाले, गुरूजी पाणी अतिप्रचंड वेगाने वाहत आहे. खाली पडल्यानंतर ते दुप्पट वेगाने उसळत आहे. सदानंदाचं उत्तर ऐकून श्रद्धानंदांनी त्यांना उपदेश केला. ते म्हणाले की, आयुष्यात यशस्वी होण्यासाठी थोडं झुकायला हवं. तुम्ही झुकायला शिकला की संपूर्ण जग तुमच्यापुढे झुकतं. यावरून सदानंद समजायचे ते समजले. आयुष्यात पुढे जाण्यासाठी अहंकारी वृत्ती नाही तर नम्रता कामी येते, हे त्यांना उमगलं.



## शंकराची गुहा

तीर्थक्षेत्र


अमरनाथ यात्रेचं महत्त्व आपण जाणतोच पण जम्मू-काश्मीरमध्ये अजून एक गुहा आहे. या गुहेत भगवान शंकराचा वास असल्याचं मानलं जातं. ही गुहा शिवखोडी या नावाने ओळखली जाते. या गुहेत एक भुयारी मार्ग असून या मार्गातून अमरनाथाच्या गुहेकडे जाता येतं. या भुयारी मार्गातून जाणारी व्यक्ती परत येत नाही, असं म्हटलं जातं. जम्मूपासून १४० किलोमीटर अंतरावर असलेल्या उधमपूरमध्ये ही गुहा वसली आहे. अमरनाथ यात्रा करून आलेले भाविक या गुहेतल्या शिवलिंगाचं दर्शन करण्यासाठी आवर्जुन येतात. या गुहेतल्या भुयारी मार्गातून अमरनाथ गुहेपर्यंत जाता येतं. द्वापारयुगातले साधूसंत याच भुयारी मार्गातून अमरनाथ गुहेकडे जात असत. मात्र कलियुगात कोणीही असा प्रयत्न केलेला नाही. या भुयारी मार्गातून जाणारा माणूस परत येत नाही, असं मानलं जात असल्याने कोणी हे धाडस केलेलं नाही. सध्या हा भुयारी मार्ग बंद करण्यात आला आहे.

या गुहेतलं शिवलिंग स्वयंभू असल्याचं मानलं जातं. त्यामुळे या स्थानाचं महत्त्व प्रचंड वाढलं आहे. या गुहेचं वर्णन करायचं तर ती तीन मीटर उंच आणि २०० मीटर लांब आहे. यासोबतच गुहेत पार्वती, नंदी यांच्या मूर्ती आहेत. या मूर्तीही स्वयंभू असल्याचं मानलं जातं. तसंच गुहेच्या वरच्या भागावर सापाचं चित्र आहे. या गुहेची निर्मिती प्रत्यक्ष भगवान शंकराने केल्याचं मानलं जातं. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, भस्मासूर नावाच्या राक्षसाने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलं. आपण ज्याच्या डोक्यावर हात ठेऊ तो भस्म होईल, अशा स्वरूपाचा वर भस्मासूराने शंकराकडून घेतला. नंतर मात्र भस्मासूर शंकरालाच भस्म करायला निघाला. त्यावेळी शंकर आणि भस्मासूर यांच्यात घनघोर युद्ध झालं. या युद्धानंतरही भस्मासूराने हार मानली नाही. त्यानंतर शंकर उंच डोंगरावर गेला. तिथे त्याने गुहा तयार केली आणि लपून बसला. याच गुहेला शिवखोडी असं म्हटलं जातं. शंकराचं रक्षण करण्यासाठी विष्णूने सुंदर स्त्रीचं रूप धारण केलं. या रूपावर भाळलेल्या भस्मासूराला शंकराने दिलेल्या वरदानाचा विसर पडला आणि त्याने स्वत:च्याच डोक्यावर होत ठेवला. यामुळे तो नष्ट झाला.

## लक्षणं उत्तम गुणांची...

दासबोधातून...

मनुष्याने उत्तम गुण आत्मसात करायला हवेत. या गुणांमुळे भौतिक आणि आध्यात्मिक उन्नती होत असते. समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात या उत्तम गुणांचं वर्णन केलं आहे. दुसऱ्या दशकातल्या दुसऱ्या समासात ते उत्तम गुणांची लक्षणं सांगतात. ते म्हणतात, श्रोतां व्हावे सावधान। आतां सांगतों उत्तम गुण। जेणें करिता बाणे खूण। सर्वज्ञपणाची।।१।। वाट पुसल्याविण जाऊं नये। फळ वोळखिल्याविण खाऊं नये। पडिली वस्तु घेऊं नये। येकायेकीं।।२।। अति वाद करूं नये। पोटी कपट धरू नये। शोधल्याविण करूं नये। कुळहीन कांता।।३।। विचारेविण बोलू नये। विवंचनेविण चालों नये। मर्यादेविण हालो नये। कांहीं येक।।४।। प्रीतीविण रूसों नये। चोरास वोळखी पुसों नये। रात्री पंथ क्रमूं नये। येकायेकी।।५।।




याचा अर्थ असा की, आता मी उत्तम गुणांची लक्षणं सांगत आहे. श्रोत्यांनी ती लक्षपूर्वक आणि सावधपणे ऐकावी। ही लक्षणं ग्रहण केली तर अंगी सर्वज्ञता बाणवता येते. या लक्षणांचं वर्णन समर्थ करतात. ते सांगतात, कोणत्याही मार्गावर चालताना आधी चौकशी करूनच पुढे जायला हवं. एखादं फळ खाण्याआधी त्याची व्यवस्थित माहिती घ्यायला हवी. वाटेत पडलेली वस्तू एकाएकी उचलून घेऊ नये. फार वादविवाद करू नये, कोणाशी कपटाने वागू नये. मनात आकस धरू नये. मुलीशी विवाह करण्याआधी तिच्या कुळशीलाची व्यवस्थित चौकशी करायला हवी. नेहमी विचारपूर्वक बोलावे. पूर्वचर्चे शिवाय कोणत्याही कामाला सुरूवात करू नये. लोकांमध्ये वावरताना मर्यादेचं पालन करावं. प्रेम नसेल तिथे रूसू नये. चोराला परिचय विचारू नये. रात्री एकट्याने प्रवास करू नये. यासारखी अनेक लक्षणं समर्थांनी या समासात सांगितली आहेत.

या समासाच्या अखेरीस समर्थ म्हणतात, सत्यमार्ग सांडू नये। असत्य पंथे जाऊ नये। कदा अभिमान घेऊ नये। असत्याचा।।४०।। अपकिर्ती ते सांडावी। सत्कीर्ती वाढवावी। विवेकें दृढ धरावी। वाट सत्याची।।४१।। न घेता हे उत्तम गुण। ते मनुष्य अवलक्षण। ऐक तयांचे लक्षण। पुढीले समासीं।।४२।। याचा अर्थ असा की, सत्यमार्ग कधीही सोडू नये, असत्याच्या मार्गाने कधी जाऊ नये। असत्याचा अहंकार, अभिमान बाळगू नये। अपकिर्ती कधीही होऊ देऊ नये. सत्कीर्ती वाढवण्यासाठी प्रयत्न करावा. विवेकाचा मार्ग अवलंबवावा। सत्याची कास धरावी. हे गुण न घेणारी व्यक्ती अवलक्षणी मानली जाते. अवलक्षणी माणसाचे गुण समर्थ पुढच्या समासात वर्णन करतात. त्यामुळे शक्य तितके उत्तम गुण घेऊन आयुष्यात मार्गक्रमणा करायला हवी.

## महत्त्व शिवामुठीचं...

परंपरा

सर्वांना हवाहवासा वाटणारा, आनंद देणारा, व्रतवैकल्यं, सणवारांनी नटलेला, अत्यंत पवित्र असा श्रावण मास सुरू होत आहे. श्रावण महिन्याचे वेध काही दिवस आधीपासूनच लागू लागतात. या महिन्यात सगळीकडे पावित्र्य, मांगल्य, उल्हास आणि उत्साह भरून राहिलेला असतो. श्रावणाला धार्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. श्रावण हा शंकराला प्रिय असणारा महिना. म्हणूनच श्रावणातल्या सोमवारी शंकराची आराधना केली जाते, उपवास केला जातो. शंकराला धान्य अर्पण केलं जातं. याला शिवामूठ असं म्हणतात. पहिल्या सोमवारी शंकराला तांदळाची, दुसऱ्या सोमवारी तिळाची, तिसऱ्या सोमवारी मुगाची, चवथ्या सोमवारी जवसाची तर पाचवा सोमवार असल्यास सातूची मूठ अर्पण केली जाते. यामागे धार्मिक महत्त्व आहेच शिवाय आपल्या शेतात पिकवलेलं धान्य सर्वप्रथम देवाला अर्पण करावं, अशीही भावना आहे. तसंच या पदार्थांचं आपल्या आहारातलं महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्नही आहेच.

मनासारखा पती मिळावा यासाठी मुली शंकराची आराधना करतात. शिवामुठीच्या या व्रताला शिवमुष्ठीव्रत असंही म्हटलं जातं. विवाहानंतर पहिली पाच वर्षं शिवामुठीचं हे व्रत करण्याची परंपरा आहे. या व्रतादरम्यान एक वेळ उपवास करायचा असतो. शिवलिंगाची मनोभावे पूजा करून त्यानंतर धान्याची ही शिवामूठ अर्पण करायची असते. या व्रताचे आध्यात्मिक लाभही आहेत. या व्रतामुळे



शिवतत्त्व आकर्षित होतं. चैतन्य आणि शक्तीचा प्रवाह व्रत करणाऱ्या महिलेकडे आकृष्ट होतो. तसंच चातुर्मासात ऋतूनुसार एकभुक्त राहण्याला महत्त्व आहे. श्रावणी सोमवारच्या निमित्ताने एक वेळचा उपवासही घडतो. त्यामुळे शिवशंकराची आराधना करून श्रावणातल्या पवित्र महिन्याचे आध्यात्मिक लाभ भाविकांनी मिळवायला हवे.

## सोमवारच का?

जाणून घ्या



परमेश्वराची भक्ती करण्यासाठी काळ-वेळाची आवश्यकता नाही. देवाची भक्ती कोणत्याही दिवशी करता येते पण हिंदू धर्मातल्या प्रत्येक दैवताचा ठराविक वार आहे. सोमवार शंकराचा, मंगळवार गणपतीचा, हनुमानाचा शनिवार, गुरूदत्ताचा गुरूवार मानला जातो. त्या त्या दिवशी या दैवतांची आराधना केली जाते. मंदिरांमध्ये भक्तमंडळींची गर्दी झालेली असते. श्रावण महिन्यात शंकराच्या पूजनाला महत्त्व असतं. त्यामुळे शंकराची सोमवारी पूजा का केली जाते? सोमवार हा शंकराचा आवडता वार का आहे, याबाबतची माहिती जाणून घेऊ.

शंकराची आराधना सोमवारी करण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे. शंकराची आराधना आठवड्याच्या कोणत्याही वारी करता येते. प्रत्येक वारी शंकराची आराधना केल्याचं वेगवेगळं फळ मिळतं. याबाबतचा एक श्लोक शिवपुराणात आहे. तो असा की, आरोग्यसंपद चैव व्याधीनांशांतिरेव च। पुष्टीरायुस्तथा भोगोमृतेर्हानिर्यथाक्रमम।। याचा अर्थ असा की आरोग्य, संपत्ती, रोग-नाश, पुष्टी, आयुष्य, भोग आणि मृत्यूची हानी टाळण्यासाठी रविवारपासून शनिवारपर्यंत शंकराची आराधना करायला हवी. कोणत्याही वारी केलेली शिवाची आराधना फलद्रूप होत असेल तर सोमवारचा आग्रह का धरला जातो? यामागे अनेक कारणं आहेत.

पुराणांनुसार सोम म्हणजे चंद्र. भगवान शंकराने चंद्राला मस्तकावर धारण केलं आहे. चंद्राने शंकराकडे क्षमायाचना केली. यानंतर शंकराने त्याला क्षमा केली. अनेक अवगुण असूनही शंकराने चंद्राला आपल्या मस्तकावर धारण केलं. त्याचप्रमाणे शंकर भक्तांना मस्तकावर नाही पण चरणांवर नक्कीच स्थान देईल, या आशेने सोमवारी शंकराची आराधना करायला सुरूवात झाली असावी तर सोम म्हणजे उमा आणि शिव असंही काही भक्त मानतात. त्यामुळे सोमवारी पार्वती आणि शंकर अशा दोघांची पूजा केल्याने अनेक लाभ होतात. शक्तीशिवाय शिवाचं अस्तित्त्व नाही. त्यामुळे सोमवारी शिवाची आराधना करायला प्रारंभ झाला असावा. सोम म्हणजे सौम्य. शंकर हा समाधीस्त देव आहे. त्याचा सौम्य भाव जाणून लोकांनी सोमवारी त्याच्या पूजनाची सुरूवात केली असावी. सोममध्ये ओम सामावला आहे. ओमकार हे शंकराचं प्रतिक आहे. त्यामुळे सोमवारी शिवाची आराधना करण्याची प्रथा सुरू झाली असावी, असंही मानलं जातं.

## यात्रेला जाताना...

भक्तीयात्रा

हिंदू धर्मियांमध्ये विविध यात्रा प्रचलित आहेत. अमरनाथ, कैलास मानसरोवर, चारधाम, कावड, बारा ज्योतिर्लिंग, अष्टविनायक यासोबत कुलदेवतेच्या दर्शनाला लोक जात असतात. नवरात्रांमध्ये देवीच्या यात्रा भरतात, कुंभमेळे असतात. या यात्रांदरम्यान घातपात, अपघात होण्याची शक्यता असते. अलिकडेच अमरनाथ यात्रेकरूंवर दहशतवादी हल्ला झाला. यात्रेकरूंची बस कोसळून अपघातही झाला. याचप्रमाणे विविध यात्रांमध्ये यात्रेकरूंना तब्बेतीच्या तक्रारी निर्माण होतात. अमरनाथ, कैलास मानसरोवर सारख्या यात्रा खूप कठिण असतात. धार्मिक यात्रा हा प्रत्येकाच्या आस्थेचा, श्रद्धेचा प्रश्न असतो. कितीही हल्ले झाले तरी यात्रेकरू यात्रा पूर्ण करतातच. चेंगराचेंगरीसारखे प्रसंग उद्भवले तरी यात्रेकरूंच्या उत्साहात कुठेही कमतरता जाणवत नाही. अर्थात आध्यात्मिक




समाधान म्हणून भाविक यात्रा करणारच. या यात्रांमध्ये तरूणांची संख्या वाढताना दिसत आहे. काही तरूण मंडळी थ्रील म्हणून अशा यात्रा करतात. धार्मिक यात्रा कितीही पुण्यदायी मानल्या जात असल्या त्या करताना विशेष काळजी घ्यायला हवी. नियमांचं पालन करायला हवं. त्याविषयी...

* अमरनाथ यात्रेकरूंच्या बसवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात आठ भाविकांचा मृत्यू झाला. तर काही भाविक जखमी झाले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे लोकांचा जीव वाचला. पण नियमांचं पालन न केल्यामुळे भाविकांवर हा प्रसंग उद्भवला. ही बस सुरक्षा ताफ्यापासून वेगळी झाली होती. तसंच तिची सुरक्षा यंत्रणेकडे अधिकृत नोंदणीही करण्यात आली नव्हती. सुरक्षा ताफ्यापासून वेगळ्या झालेल्या या बसवर हल्ला करण्याचा डाव अतिरेक्यांनी साधला. त्यामुळे अशा यात्रांमध्ये जाण्याआधी आपली बस नोंदणीकृत आहे की नाही, याची खात्री करून घ्यायला हवी.

* अमरनाथ, कैलाश मानसरोवर सारख्या यात्रा अत्यंत कठिण असतात. या यात्रा करताना आरोग्य तपासणी करून घेणं गरजेचं असतं. अनेकजण त्या टाळतात. यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

* बऱ्याच यात्रांदरम्यान चेंगराचेंगरी होते. रांग मोडल्याने किंवा दर्शनासाठी गर्दी केल्याने असं होऊ शकतं. प्रशासन वेळावेळी नियमांबाबत सांगत असतं पण भाविक त्याकडे दुर्लक्ष करतात, रांगा मोडतात. यामुळे असे प्रसंग उद्भवतात. यासोबतच अफवांवर विश्वास ठेवल्याने असं होऊ शकतं.

* कुंभमेळ्याला किंवा तीर्थक्षेत्री गेल्यानंतर नदीच्या पाण्यात आंघोळ केली जाते. पाण्यात उतरताना खबरदारी घेण्याबाबत प्रशासन वारंवार सांगत असतं पण भाविकांना नदीत स्नान करून पुण्य मिळवायचं असतं. या नादात सगळे नियम पायदळी तुडवले जातात आणि अपघातांना निमंत्रण मिळतं. त्यामुळे यात्रांना जाताना तिथल्या परिस्थितीची, वातावरणाची माहिती करून घ्यावी. यात्रेच्या नियमांचं पालन करावं. यामुळे यात्रा निर्विघ्न पार पडू शकेल.

## भाजपच्या माजी पदाधिकाऱ्याला
# पिस्तूलासह विमानतळावर अटक

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६ :**
शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन काडतूससह एका प्रवाशाला अटक करण्यात आली. सोनेगाव पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

विमानतळावर शुक्रवारी संध्याकाळी नागपूरहून दिल्लीला प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाकडून एक देशी पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली. अनिल श्रीकृष्ण पोराद (३८ वर्षे) असे आरोपी प्रवाशाचे नाव असून तो यवतमाळचा रहिवासी आहे. अरुण हा माजी भाजप पदाधिकारी असल्याचे सांगितले जाते. सीआयएसएफकडून रात्री उशिरापर्यंत चौकशी सुरू होती. त्यानंतर त्याला सोनेगाव पोलिस ठाण्याच्या हवाली करण्यात आले.

शुक्रवारी संध्याकाळी ६:४५ वाजता इंडिगो एअरलाइन्सच्या नागपूर-दिल्ली फ्लाइट क्रमांक ६ ई २२१३ वरून तो दिल्लीला जाण्याच्या तयारीत होता. त्याने बॅगेत एक देशी पिस्तूल आणि दोन काडतुसे ठेवली होती. सीआयएसएफने केलेल्या यांत्रिक तपासणीदरम्यान त्याच्या बॅगेत शस्त्रे असल्याचे दिसून आले.

यानंतर, पथकाने बॅगची झडती घेतली तेव्हा त्यात एक पिस्तूल आणि काडतुसे आढळली. सीआयएसएफच्या जवानांनी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि आरोपीला आपल्या ताब्यात घेतले. देशी पिस्तूल आणि काडतुसे कुठून आली हे त्याला माहिती नाही, ते कुणी तरी बॅगेत ठेवले असा त्याने अगोदर दावा केला. मात्र, कठोर चौकशी केल्यानंतर त्याने सांगितले की, त्याने हे पिस्तूल दोन महिन्यांपूर्वी खरेदी केले होते.

त्याच्याकडे पिस्तुलाचा परवानाही नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अरुण हा कृषी व्यापारी असून त्याची दालमिल आहे. व्यवसायाच्या संदर्भात एका सरकारी संस्थेच्या दिल्ली कार्यालयात जात होता. रात्री उशिरापर्यंत सीआयएसएफकडून त्याची चौकशी करण्यात आली. आता सोनेगाव पोलिस ठाण्यात त्याची चौकशी होईल.

दरम्यान सायंकाळी दिल्लीकडे जाणाऱ्या विमानातून तो रवाना होणार होता. यावेळी त्याने आतमध्ये प्रवेश करतेवेळी तेथील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांना त्याच्या बॅगमध्ये काही संशयास्पद वस्तू असल्याचे आढळून आले.

त्यांनी तपासणी केली असता बॅगमध्ये एक विदेशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस आढळून आले. ही माहिती मिळताच सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ एकचे ऋषीकेश रेड्डी, सहाय्यक पोलिस आयुक्त अशोक शेळके आणि सोनेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन मगर यांच्यासह ताफा घटनास्थळी दाखल झाला.

त्यांनी आरोपीला ताब्यात घेत त्याला विचारपूस केली. यावेळी त्याने पिस्तूलचा परवाना असल्याचा दावा केला. मात्र, तो त्याच्या आढळून न आल्याने पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल करीत अटक केली.

# चालती गाडी पंक्चर करण्याचे काम : सरकार निकम्मे

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६ :**
केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी हे बेधडक बोलण्यासाठी प्रसिद्ध आहे. नागपुरातील सुरेश भट सभागृहात शनिवारी दुपारी त्यांनी एका कार्यक्रमात बोलताना सरकार निकम्मी असल्याचे सांगत सगळ्यांना आश्चर्याचा धक्काच दिला.



केंद्रीयमंत्री रोखठोकच बोलले

सरकारी यंत्रणांचा कामात अडसर

विदर्भ एडव्हेंचर असोसिएशन, नागपूरतर्फे भट सभागृहात आयोजित स्पोर्ट्स अँज ओ करियर सेमिनारमध्ये नितीन गडकरी बोलत होते. गडकरी पुढे म्हणाले, चांगले दिवस सुरू असल्यास तोंडावर प्रशंसा करणारे अनेक लोक मिळतात. परंतु हे दिवस निघून गेल्यावर अडचणीच्या काळात कोणीही विचारत नाही. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात मेहनत घेऊन प्रत्येकाने चांगले करियर घडवायला हवे.

मी फायनान्शियल तज्ज्ञ, लेखापाल नाही. परंतु चांगला फायनान्शिलय समूपदेशक आहे. मी पाच लाख कोटी रुपयांपर्यंतचे रस्ते- पुलाचे काम हातात पैसे नसतांनाही करतो.

नागपुरात मला ३०० स्टेडियम तयार करण्याची इच्छा आहे. परंतु शासकीय यंत्रणेकडून अडचणी येतात. सरकार ही निकम्मी गोष्ट आहे. सरकारच्या अखत्यारित असलेली महापालिका, नागपूर सुधार प्रण्यास वा इतर संस्था काही कामाच्या नाही. या सगळ्या यंत्रणा चालू गाडीला पंक्चर करण्याचे काम करते. त्यामुळे दुसऱ्या पद्धतीने काम करवून घ्यावे लागते.

माझ्याकडे एक दुबईचा व्यक्ती आला. तो तेथे स्टेडियम चालवत होता. त्याला आता नागपुरातील स्टेडियमसाठी कंत्राट काढण्याचे काम दिले. त्यानुसार मैदान, तेथे पाणीसह इतर सोयी व बांधकाम शासन करेल. परंतु ते उत्तमरित्या चालवण्यासह त्याच्या देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी संबंधित व्यक्तीची असेल.

त्यासाठी तो येथे विविध खेळासाठी येणाऱ्या तरुणांकडून माफक शुल्क आकारेल. येथे कुणालाही फुकट सोय द्यायला नको. कारण फुकट गोष्टीची कुणालाही किंमत नसते. पैसे देऊन संबंधित व्यक्ती प्राणाणिकपणे मेहनत घेतो, असेही गडकरी म्हणाले. या कार्यक्रमाला पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### राजकारण हा फुकट्यांचा बाजार

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री मंत्री नितीन गडकरी यांनी राजकारणाबाबतही महत्वाचे भाष्य केले. गडकरी म्हणाले, मी अनेक वर्षांपासून राजकारणात आहे. राजकारण हा फुकटांचा बाजार आहे. राजकारणांकडून फुकटात काय मिळणार? यासाठीच प्रयत्न केले जातात. नागपूरात आम्ही प्रत्येक वर्षी सांस्कृतिक महोत्सव भरवत असतो. त्याला हजारोंची गर्दी होते. प्रत्येक वर्षी येथे तीन वेळा लाठीचार्ज होतो. पूर्वी आम्ही प्रत्येक नेत्यांना पास वाटत होतो. त्यातला कुणी व्यक्ती यायचा, कुणी गैरहजर रहायचा. परंतु आता वर्तमानपत्रात क्यूआर कोड प्रसिद्ध करतो. त्यावर स्कॅन करून नागरिक स्वतःचे आरण आरक्षीत करतो. त्यातून आता अनुचित प्रकार कमी झाल्याचेही गडकरी म्हणाले.

# राहुल गांधींची टीका म्हणजे राजकीय अपरिपक्वतेचे उदाहरण

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** राहुल गांधी यांची टीका म्हणजे राजकीय अपरिपक्वतेचे, नैराश्याचे आणि त्यांच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याचे भाजपचे नेत चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणजे मोदी, 'शो' नाहीतर 'विकासाचा रोड शो' असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी मोदींवर टीका करत त्यांच्यासाठी 'गुब्बारा' शब्द वापरला होता. यावरुन बावनकुळे यांनी पलटवार केला आहे.

या संदर्भात मंत्री बावनकुळे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राहुल गांधी यांच्यावर टीका केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, जनतेने निवडणुकीत १० वेळा तुमच्या पक्षाचा हवेचा फुगा फोडला असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे. देशाच्या १४० कोटी जनतेनं सलग तिसऱ्यांदा मोदीजींवर विश्वास ठेवला, पूर्ण बहुमत दिले. त्या नेत्याबद्दल अशी भाषा वापरणं म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे.

बावनकुळेंचा पलटवार



राहुल गांधी यांनी कायम लक्षात ठेवायला हवे की, मोदी शो नाहीत, ते विकासाचा रोड शो आहेत. मोदी म्हणजे दिशा तर राहुल गांधी म्हणजे दिशाभूल हे देशातील जनतेनं ओळखले आहे. तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी गुब्बारा हा शब्द वापरताय पण जनतेने निवडणुकीत १० वेळा तुमच्या पक्षाचा हवेचा फुगा फोडला आहे, असेही ते म्हणाले.

## स्व. भानुताई गडकरी डायग्नोस्टिक
# सेंटरचे लोकार्पण आज
### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते होणार उद्धाटन

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६ :**
कमाल चौक लष्करीबाग येथील स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे लोकार्पण रविवार, २७ जुलै २०२५ रोजी होणार आहे.

गोरगरीब जनतेला अत्यंत माफक दरात वैद्यकीय तपासण्यांची सेवा उपलब्ध करून देणाऱ्या या केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांची विशेष उपस्थिती असेल.

लष्करीबाग येथील कमाल चौक परिसरात दुपारी १२.३० वाजता हा कार्यक्रम होईल. यावेळी बेंगलुरू येथील महाबोधी सोसायटीचे जनरल सेक्रेटरी भंते आनंद थेरा, नागपूर येथील रामकृष्ण मठाचे अध्यक्ष राघवेंद्र स्वामी, माजी मंत्री अँड. सुलेखाताई कुंभारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महानगर संघचालक राजेश लोया, विशाखापट्टणम येथील एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा आणि भाजपचे नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांची प्रमुख उपस्थिती असेल.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून आकाराला येत असलेल्या या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, एक्स-रे, सिटी स्कॅन, एमआरआय, डायलिसिस या सुविधा उपलब्ध असणार आहेत.

# कथित गोरक्षकांकडून दलित युवकाला अमानुष मारहाण

दगडाने ठेचत अंगावर गायी सोडल्या

■ **महासागर प्रतिनिधी, खामगाव, दि. २६ :** पुरोगामी बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्राला हादरवून सोडणारी खळबळजनक घटना खामगाव शहरामध्ये घडली. काही कथित गोरक्षकांनी गाई चोरीच्या संशयावरून मध्यरात्री दलित युवकास दगड व लाता बुक्क्यानी बेदम मारहाण करून त्याला रक्तबंबाळ केले.

युवकाच्या सुदैवाने मारहाण होत असताना पोलिसांची रात्र गस्तीचे वाहन घटनास्थळी पोहोचल्याने संभाव्य अनर्थ टळला. रोहन संतोष पैठणकर (वय २१), रा. शामल नगर, शेगाव रोड, खामगाव, जिल्हा बुलढाणा, असे अमानुष मारहाण करण्यात आलेल्या दलित युवकाचे नाव आहे. तो एका हॉटेल मध्ये वेटरचे काम करतो. रोहन हा रात्री साडे अकरा वाजताच्या सुमारास खामगाव बस स्थानक जवळ मित्रांसोबत गप्पा मारत होता. यावेळी तिथे आलेल्या दोघांनी त्याला खामगाव शहरातील बस स्थानक परिसरातून आपल्या जवळील वाहनाने जवळच असलेल्या मोकळ्या मैदानात नेले. यावेळी त्याला हाता पायांनी व दगडाने अमानुष मारहाण केली. त्याचे कपडे फाडले. त्याच्या अंगावर मोकाट गाईसोडून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले.



यानंतर त्याला खामगाव मधीलच घाटपुरी नाका परिसरातील दंडेस्वामी मंदिर परिसरात नेण्यात आले. तिथे आणखी एक युवक आला. या तिघानी रोहन ला पुन्हा क्रूरपणे मारहाण केली. यामुळे त्याच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली. आपण गाई चोर नसल्याचे विनवणी करून सांगत असताना देखील त्याला मारहाण करण्यात आली.

दरम्यान त्याच वेळी योगायोगाने शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पोलीस गस्त वाहन घटना स्थळी जवळ आले. त्यांनी जायबंदी रोहनला उपचारासाठी हलविले. या मारहाणीत या तरुणाचा एक डोळा निकामी झाला असून नाकाचे हाड मोडले आहे. या तरूणावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे.

या प्रकरणी शिवाजी नगर पोलिसांनी गब्बू गुजरिवाल, प्रशांत गोपाल संगेले आणि रोहित पगारिया, तिन्ही रा., खामगाव याच्या विरुद्ध ॲट्रासिटी व अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन तरुणांना अटक केली आहे मात्र तिसरा अद्यापही फरार आहे. याप्रकरणी आता दलित संघटना आक्रमक झाल्या असून ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार खामगाव येथे येऊन त्या तरुणाची भेट घेणार आहेत.

